रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ • अंक ७५
www.ramprahar.com

गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹ २

## जि.प., पं.स. निवडणुकांसाठी १३ ऑक्टोबरला आरक्षण सोडत

**मुंबई :** राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर रोजी सोडत काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर रोजी वृत्तपत्रात सूचना प्रसिद्ध करतील. १३ ऑक्टोबर रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून ३ नोव्हेंबर रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाईल. दरम्यान, २४७ नगर परिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदाच्या व थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यावर १३ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २८ ऑक्टोबरला जाहीर होईल.

अंतरंग

ट्रान्सफॉर्मरमधील कॉईल चोरणारे गजाआड/२

खोपोली पालिकेने शास्ती अभय योजना लागू करावी/५

टी-२०मध्ये अभिषेकचा नवा विश्वविक्रम/८

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आज ऐतिहासिक विजयादशमी उत्सव

## नागपूर सज्ज; मान्यवरांची लाभणार उपस्थिती

**नागपूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षातील विजयादशमीचा उत्सव गुरुवारी (दि.२) नागपूर येथील रेशीमबाग मैदानावर साजरा होणार आहे. या सोहळ्याला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत या वेळी मार्गदर्शन करणार असून संपूर्ण देशाचे त्यांच्या भाषणाकडे लक्ष आहे.

विजयादशमीच्याच दिवशी १९२५मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली होती. यंदा संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याने संघाचा शताब्दी वर्षातील हा ऐतिहासिक विजयादशमी सोहळा राहणार आहे. या उत्सवात देशातील आणि देशाबाहेरील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये अमेरिका, थायलंड, इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका, घाना यांसारख्या देशांचे प्रतिनिधींचा समावेश आहे. त्यामुळे या सोहळ्याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे तसेच उद्योग, चित्रपट अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची सोहळ्याला उपस्थिती राहणार आहे. संघाने आंतरराष्ट्रीय दुतावासांनाही सोहळ्याचे निमंत्रण दिले आहे.



सरसंघचालकांचे या सोहळ्यात होणारे भाषण हे संघाची पुढील दिशा ठरवणारे असते तसेच यातून स्वयंसेवकांनाही संदेश दिला जातो. यंदाचा विजयादशमी उत्सव विशेष असल्याने सरसंघचालक डॉ. भागवत कोणत्या मुद्द्यांना स्पर्श करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### *देशभरात कार्यक्रम अन् पथसंचलन*

*नागपूरमध्ये शताब्दी वर्ष सोहळा साजरा होणार असून येथे प्रत्येकाला उपस्थित राहणे शक्य नाही. त्यामुळे यंदा नागपूरसह देशभरात संघाच्या शाखा असणाऱ्या विविध भागांमध्येही शताब्दी सोहळा साजरा होणार असून पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले आहे.*

# राष्ट्रकार्यात आरएसएसचे महत्त्वाचे योगदान

## ■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन; शताब्दीनिमित्त सोहळा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्र निर्माणाच्या कार्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) महत्त्वाचे योगदान दिले. संघाने स्थापनेपासूनच स्वतःला राष्ट्रकार्यात वाहून घेतले होते. स्वातंत्र्यलढ्यात संघाचे संस्थापक सरसंघचालक डॉ. केशव हेडगेवार यांना तुरूंगवास भोगावा लागला. त्यांच्याबरोबर संघाचे अनेक सदस्यही तुरूंगात गेले होते, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. ते दिल्लीत आयोजित संघाच्या शताब्दी सोहळ्यात बोलत होते.




या वेळी पंतप्रधान मोदींनी संघाच्या १०० वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले, संघाच्या अनेक शाखा समाजाच्या विविध घटकांसाठी काम करतात. इतक्या शाखा असूनही त्यांच्यात कधीही वाद झाले नाहीत, कारण सर्वांचा उद्देश एकच आहे तो म्हणजे राष्ट्र प्रथम. संघाने स्वातंत्र्य चळवळीत अनेकदा भाग घेतला होता आणि कित्येक स्वातंत्र्यवीरांना निवारा आणि मदत देण्याचेही काम केले.

१९४२ साली महाराष्ट्रातील चिमूर येथील आंदोलनात संघाच्या अनेक स्वयंसेवकांना ब्रिटिशांकडून त्रास सहन करावा लागला होता. एवढेच नाही तर स्वातंत्र्यानंतरही हैदराबादच्या निजामांकडूनही संघाच्या स्वयंसेवकांना त्रास भोगावा लागला. गोवा आणि दादरा व नगर हवेलीच्या स्वातंत्र्यासाठीही संघाने आंदोलन केले होते, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

पंतप्रधान मोदींनी पुढे म्हटले की, उद्या विजयादशमी आहे. या सणाचे आपल्या संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाईटावर चांगल्याचा विजय, असत्यावर सत्याचा विजय, अन्यायावर न्यायाचा विजय आणि अंधकारावर प्रकाशाचा विजय हे सणाचे प्रतीक आहे. १०० वर्षांपूर्वी या विजयादशमीनिमित्त संघाची स्थापना करणे हा योगायोग नव्हता, तर ते हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या परंपरा, संस्कृतीचे पुनरुत्थान होते. आपली पिढी भाग्यशाली आहे की, आपण संघाचा शताब्दी सोहळा पाहू शकलो.

या सोहळ्यात पंतप्रधान मोदींच्या हस्ते संघाला वाहिलेले १०० रुपयांचे विशेष नाणे आणि पोस्टाच्या तिकीटाचे अनावरण केले. १०० रुपयांच्या नाण्यावर भारतमातेची प्रतिमा कोरण्यात आली आहे. यावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच नाण्यावर भारतमातेला स्थान मिळाले आहे.



# सर्वसमावेशक विकासामध्ये पनवेल महापालिका अग्रेसर

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकासामध्ये पनवेल महापालिका अग्रेसर असल्याचे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले. या महापालिकेने नऊ वर्षामध्ये देशपातळीवर विविध सन्मान मिळवलेले आहेत. महापालिकेची वास्तू जशी आयकॉनिक इमारत बनते आहे तशीच मनपाची प्रतिमाही आयकॉनिक बनावी यासाठी आयुक्त मंगेश चितळे व सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना आमदारमहोदयांनी शुभेच्छा दिल्या.

पनवेल महापालिकेच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्ताने बुधवारी (दि. १) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

पनवेल महापालिका विविध विकासकामांच्या माध्यमातून नागरिकांशी जोडली जात आहे. विमानतळ सुरू झाल्यावर पनवेलचे नाव देशपातळीवर येणार असल्याचे सांगून अनेक आव्हानांना तोंड देत, नागरिकांचे हित जपत आपण पुढे जायचे आहे. दशकपूर्ती वर्षारंभ करत विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या सेवेशी जोडले जात असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले. **(पान २ वर..)**

## निवडक

### आयईएस, आयएसएस परीक्षेचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली :** युनियन पब्लिक सर्व्हिसेस अर्थात यूपीएससी अंतर्गत येणाऱ्या इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस (आयईएस) आणि इंडियन स्टॅटस्टिक्स सर्व्हिसेसच्या (आयएसएस) परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. आयईएसमध्ये मोहित अग्रवाल नदबईवाला पहिला आला आहे, तर ऊर्जा रहेजाने दुसरे आणि गौतम मिश्राने तिसरे स्थान पटकावले. आयएसएसमध्ये कशिस कसाना पहिला आला असून आकाश शर्माने दुसरा, तर शुभेंदू घोषने तिसरे स्थान प्राप्त केले.

### केंद्र सरकारकडून सहा पिकांच्या ‘एसएमपी’त वाढ

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने बुधवारी (दि. १) रब्बी मार्केटिंग हंगाम २०२६-२७साठी सहा पिकांच्या किमान आधारभूत किमती (एसएमपी)मध्ये वाढ केली. यामध्ये गहू, करडई, मसूर, मोहरी, हरभरा, बार्ली यांचा समावेश आहे.

# नवी मुंबई विमानतळाला ‘दिबां’चेच नाव दिले जाणार -आमदार महेश बालदी



**उरण : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन येत्या ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव देण्यात येणार असल्याचे आमदार महेश बालदी यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, केंद्र सरकारनेही लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव देण्याला सकारात्मकता दर्शवली असून नाव देण्याची प्रक्रिया सुरू आहे आणि ती लवकरच पूर्ण होईल, असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले. ‘दिबां’च्या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही नाव नाही, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान आमच्यावर अनेक केसेस दाखल झाल्या. त्या काळात आम्ही आमचे सहकारीही गमावले आहेत, असे सांगून जेव्हा आम्ही पाच वर्षे आंदोलन करत होतो, तेव्हा हे लोक कुठे होते? असा प्रश्न उपस्थित करीत आमदार महेश बालदी यांनी खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्यावर टीका केली.

## देवी दर्शन



**उलवे नोड : आदिशक्तीचा जागर करणारा पवित्र नवरात्रोत्सव उलवे परिसरात मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा होत आहे. या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच विजय घरत, योगिता भगत, किशोर पाटील, सागर ठाकूर, निलेश खारकर, निकिता खारकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, मंडळाचे सदस्य आणि भाविक उपस्थित होते. (अधिक छायाचित्रे पान ३ वर..)**



# कर्जतमधील ‘उबाठा’ नेते भालचंद्र जोशी भाजपमध्ये

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी कर्जत शहरप्रमुख आणि माजी नगरसेवक भालचंद्र जोशी यांनी बुधवारी (दि.१) पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘कमळ’ हाती घेतले.

पनवेल येथील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, जेष्ठ नेते रमेश मुंढे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश भगत, माजी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, कर्जत मंडळ अध्यक्ष राजेश लाड, महिला मोर्चा नेरळ मंडळ अध्यक्ष नम्रता नितीन कांदळगावकर आदी उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत जोशी यांचे स्वागत करण्यात आले आणि त्यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

भालचंद्र जोशी हे २००९ ते २०१४दरम्यान मनसेतून नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी शिवसेना कर्जत शहरप्रमुखपदाची जबाबदारीही सांभाळली होती. काही काळ राजकीय क्षेत्रापासून दूर राहिल्यानंतर आता त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

जोशी हे सामाजिक व सांस्कृतिक कार्यातही अग्रेसर असून कर्जतमधील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, सर्व शाखीय ब्राह्मण सभा आणि विविध संस्थांमध्ये सक्रिय आहेत. मागील नगर परिषद निवडणुकीत महायुतीच्या विजयात त्यांचा मोठा वाटा राहिला होता. त्यांच्या प्रवेशामुळे कर्जत शहरातील भाजप अधिक मजबूत झाल्याचे मानले जात आहे.

# एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील पूरपरिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने केलेली १० टक्के दरवाढ रद्द करण्याचे निर्देश परिवहनमंत्री यांना दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले की, एसटी महामंडळ दरवर्षी दिवाळीदरम्यान १० टक्के भाडेवाढ करीत असते. यातून साधारणपणे महामंडळाला ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो, मात्र यंदा राज्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती लक्षात घेऊन अपवाद म्हणून महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के भाडेवाढ रद्द करण्याबाबत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.



# हस्त नक्षत्राच्या पावसाचा रायगड जिल्ह्यातील भातशेतीला तडाखा

**अलिबाग : प्रतिनिधी**

हस्त नक्षत्रावर आलेल्या पावसाचा रायगड जिल्ह्यातील भात शेतीला तडाखा बसला आहे. जिल्ह्यात आठवडाभरात २ हजार १८५ हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील भात पिकाचे नुकसान झाल्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. कर्जत, पेण, खालापूर आणि अलिबाग तालुक्यातील शेतीला या पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे.



राज्यातील इतर भागांच्या तुलनेत कोकणात पिक परिस्थिती यंदा बरी होती. वार्षिक सरासरीच्या तुलनेत कोकणात कमी पाऊस झाला. मे आणि जुन महिन्यात सरासरीच्या तुलनेत चांगला पाऊस झाला. मात्र जुलै आणि ऑगस्टमध्ये पर्जन्यमान कमी होते, मात्र सप्टेंबर महिन्यात जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या, अनियमित पाऊस असूनही यंदा भाताचे पिक जोमाने आले होते. शेतकऱ्यांना चांगल्या उत्पादनांची अपेक्षा होती. मात्र लोब्यांमध्ये दाणे भरण्यास सुरवात झाली असतांनाच हस्त नक्षत्राच्या मुहूर्तावर पुन्हा एकदा पावसाला सुरूवात झाली आहे. त्यामुळे तयार होत आलेले पिक वादळी वारे आणि पावसामुळे आडवे झाले आहे. पाच हजारहून अधिक शेतकऱ्यांच्या हाताशी आलेले पिक पावसामुळे नष्ट झाले आहे. पेणमधील ७५६ हेक्टर, कर्जत ७३१ हेक्टर, उरण २४४ हेक्टर, अलिबाग २३८ हेक्टर तर तळा आणि रोहा येथे सुमारे ५० हेक्टरवरील भात शेतीला हस्ताच्या नक्षत्रावर पडलेल्या पावसाचा तडाखा बसला आहे. एकूण ५ हजार ८७८ शेतकऱ्यांचे ३३ टक्के पेक्षा अधिक क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झाले आहे. ६०६ गावातील शेतकऱ्यांचा यात समावेश आहे. त्यामुळे कृषी विभागाने शासनाकडे १ कोटी ८५ लाख रुपयांच्या अनुदानाची मागणी केली आहे. त्यापूर्वी जून ते ऑगस्ट या कालावधील ६६ हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाले होते अशी माहिती जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाकडून देण्यात आली.

जिल्ह्यात ९० हजार हेक्टर हे खरीप लागवडीखालील क्षेत्र असून यावर्षी ७० हजार ६६६ हेक्टरवर यावषी खरीपाची लागवड करण्यात आली होती. वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरण यामुळे या वर्षी लागवड क्षेत्रात २० हजार हेक्टरची घट झाल्याचे दिसून आले होते.

## आजी माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट



**चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या कालावधीमध्ये सेवा पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय राज्य सरकार कडून झालेला आहे त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी सदर अभियानातील नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत आजी-माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याबाबत सूचना दिल्या. खोपोली नगरपालिका हद्दीतील एकूण ४३ आजी-माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्यात आल्याचा कार्यक्रम तहसीलदार व खोपोली नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता.



**खालापूर : शिवतेज मित्र मंडळाच्या नवरात्रोत्सवातील देवीचे अनेकांनी दर्शन घेतले.**

# महाराष्ट्रातील सर्वात मोठा गरबा नमो रमो नवरात्री २०२५



**डोंबिवली : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील सर्वात मोठा गरबा म्हणून नावलौकिक मिळवलेला डोंबिवलीचा नमो रमो गरबा आता गरबाप्रेमींसोबत देवीभक्तांसाठीही श्रद्धेचे स्थान बनत आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सावळाराम महाराज क्रीडा संकुलात उभारलेल्या भव्य मंडपात या नमो रमो गरब्यात प्रवेश केल्यावर अत्यंत पवित्र तितकेच भव्य असे अंबे मातेचे मंदिर उभारण्यात आले आहे. जिथे दररोज वेगळ्या रंगातील नैसर्गिक फुलांची आकर्षक आणि अतिशय नाविन्यपूर्ण आरास करण्यात येते. त्यामुळे गरबा मनोरंजनाहून अधिक श्रद्धेचा व आस्थेचा विषय झाल्याचे मत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केले.

मुंबई आणि महाराष्ट्रात डोंबिवलीचा नमो रमो गरबा आता फार प्रसिद्ध झाला आहे. सांस्कृतिक राजधानी म्हणून डोंबिवलीची कीर्ती सर्वत्र आहेच. पण गेली काही वर्ष नमो रमो नवरात्री या नावाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सवही डोंबिवलीतच साजरा केला जातो त्यात जगप्रसिद्ध गरबा कलाकार येण्यास उत्सुक असतात. यंदा सुप्रसिद्ध गायक निलेश गढवी, अल्पा बेन पटेल, राहुल पुरेचा, माधवी श्रीवास्तव, अंशिका चोणकर नवरात्रीचे नऊ दिवस आपल्या नमो रमो नवरात्रीचा उत्सव रंगतदार करत आहेत. पण याच सोबत सिंधुदुर्गातील भजनी मंडळांचे जोशपूर्ण सादरीकरण यंदाचे खास आकर्षण ठरले. त्याच सोबत देवीमाहात्म्य पारायण, चण्डियाग, ललिता सहस्रामृत निमित्ताने झालेल्या वेदमंत्रांनी नमो रमो मंडपात नादब्रह्म सुरांची अनुभूती मिळाल्याची प्रतिक्रिया देवीभक्तांनी बोलताना दिली.

सालाबादप्रमाणे या वर्षीही सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक संजय धबडे ह्यांनी भव्य सेट उभारला आहे. तसेच यावर्षी पूर्ण वातानुकूलित अंदाजे ७० हजार स्क्वेअर फूट प्लेयिंग अरेना आहे. त्यासाठी स्वस्तिक इव्हेंट्सचे अनिल पासड ह्यांनी १३५ फूट बाय ५०० फूट अशा भव्य एसी डोमची निर्मिती केली आहे.

यंदाही गरबाप्रेमींना सुरक्षित, निरोगी आणि आनंदी वातावरणात गरब्याचा मनमुराद आनंद लुटता यासाठी प्रत्येक गोष्टींवर बारकाईने विशेष लक्ष देण्यात आले आहे. म्हणूनच एसी टॉयलेट्स, अनुचित प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही आणि बाऊन्सर्सची प्रायव्हेट सिक्युरिटी या बरोबरच फूड कोर्ट, पार्किंग, सेल्फी पॉईंट्स अशी उत्तम व्यवस्था केली आहे. घटस्थापना ते नवमी असा नऊ रात्रींचा गरबा एक आनंददायी आणि भरपूर ऊर्जा देणारा अनुभव बनल्याचे भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. दसऱ्याच्या दिवशी होणारं रावण दहन पाहण्यासाठी तर अलोट गर्दी होते. हा सोहळा प्रत्यक्ष अनुभवायचा असेल तर गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता नमो रमो नवरात्रीमध्ये येण्याचं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

## तळा तालुक्यातील वानस्तेची कालिका देवी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील वानस्ते गावातील कालिका देवी, जी 'वानस्ते करीण' म्हणून ओळखली जाते, ही तालुक्यातील एक जागरूक आणि नवसाला पावणारी देवी म्हणून हे देवस्थान पुढे येत आहे .तळा, माणगाव तालुक्यात जागृत देवस्थान म्हणून भक्तांची भावना आहे.



तळ्यापासून अंदाजे ३ की.मी.अंतरावरती वानस्ते गाव असून वानस्ते गावात प्रवेश करतानाच कालीकामातेचे मंदिर आहे. सिकेपी समाजातील तळेकर प्रधान - देशमुख कुटुंबीयांची कुलस्वामिनी आहे. त्यामुळे या कुटुंबातील रायगड , पुणे , मुंबइ सह इतर राज्यात स्थायिक असलेले देशमुख कुटुंबीय येथे दर्शनाला येत असतात.या मंदीरात बापुजीबुवा आणि योगेश्वरी देवीची ही मुर्ती आहे. वानस्ते गावातील नासकर कुटुंबाकडे पुजार्याचा मान आहे.

येथील मंदीर जुने झाले होते. त्यामुळे त्याचा जिर्णोध्दार करण्यात येउन नविन सुंदर मंदीर बांधण्यात आले आहे. या मंदिर परिसरात प्रवेश केल्यानंतर मंदिराची भव्यता व निसर्गाची रम्यता पाहून मन प्रसन्न व शांत होऊन, मंदिरात प्रवेश केल्यानंतर मनातील विकार दूर होऊन एक वेगळा असा आनंद मिळत असतो.यादेवीच्या दर्शनाने मनातील इच्छा पूर्ण होतात. असे भक्तगण म्हणत असतात.

पूजा-अर्चेची जबाबदारी गावकरी स्वतः पार पाडतात. दरवर्षी नवरात्रोत्सवात नऊ दिवस विविध आध्यात्मिक कार्यक्रम होऊन मोठ्या भक्तिभावाने उत्सव साजरा केला जातो. या काळात तळा तालुक्यातील तसेच आसपासच्या गावांतील भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात आणि नवस करतात. त्यामुळे ही देवी 'नवसाला पावणारी देवी' म्हणून संपूर्ण तालुक्यात प्रसिद्धीस येत आहे. या मंदिरांमुळे गावात सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेची परंपरा जपली जाते.

## ट्रान्सफॉर्मरमधील तांब्याची कॉईल चोरणारे चोरटे गजाआड; नेरळ पोलिसांची कारवाई

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ, कर्जत आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रान्सफॉर्मर फोडून तांब्याचे कॉईल चोरी करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश नेरळ पोलिसांनी केला असून धडाकेबाज कारवाईत चौघा चोरांना गजाआड करण्यात पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत तब्बल एक लाख रुपयांचे ३१० किलो वजनाचे तांब्याचे कॉईल हस्तगत करण्यात आले आहे.



६ सप्टेंबर रोजी नेरळ पूर्व परिसरातील कळंब राज्य मार्गावर डिस्कव्हर रिसॉर्ट समोरील उल्हास नदीकाठी कोल्हारे ग्रामपंचायत पाणी योजनेसाठी बसवलेला ट्रान्सफॉर्मर रात्रीच्या अंधारात अज्ञात चोरट्यांनी फोडून त्यातील किंमती तांब्याचे कॉईल आणि ऑईल चोरून नेले होते.या गुन्ह्याची तक्रार मिळाल्यानंतर नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची नेमणूक करण्यात आली.

तपास पथकाने मिळालेल्या सुगाव्यानुसार कारवाई करत कर्जत तालुक्यातील खोंड्याची वाडी येथून तीन आणि ठाणे जिल्ह्यातील पाटगाव येथून एक अशा चार चोरट्यांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेले आरोपी चंदर बाबू ठोंबरे,सुनील अनंता हिंदोळा,नितीन पांडुरंग हिंदोळा (खोंड्याची वाडी) आणि विष्णू भालचंद्र कडाली (शेलदर वाडी, पाटगाव, ठाणे) यांना ताब्यात घेतले.

दरम्यान चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार या टोळीने केवळ नेरळच नाही तर कर्जत आणि माथेरान हद्दीतही ट्रान्सफॉर्मर फोडून तांब्याचे कॉईल चोरी केली होती.

पान १वरुन

## सर्वसमावेशक विकासामध्ये पनवेल महापालिका अग्रेसर

आयुक्त मंगेश चितळे म्हणाले की, पनवेल महापालिका दहाव्या वर्षात पदार्पण करत आहे. दशकवर्षपूर्ती वर्षारंभ करताना समाजातील सर्व घटकांचा विचार करून सर्व समावेशक अशा १२ विविध कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित करण्यात आले आहे. यामध्ये सदिच्छा चषक क्रिकेट स्पर्धा, संस्कृती संवर्धन महोत्सव, बेरोजगार मेळावा, ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता संवाद, महापालिका गीत निर्मिती, बाल रंगभूमी विकास परिषद, महिला सक्षमीकरण उपक्रम, जागर आदिवासी संस्कृतीचा अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असेल. आयुक्तांनी या वेळी गेल्या नऊ वर्षातील वाटचालीचा व महापालिकेला मिळालेल्या पारितोषिकांची माहित देत आढावा घेतला. त्याचबरोबर महापालिका क्षेत्रातील सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी, राज्य शासन, माजी आयुक्त, अधिकारी व कर्मचारी यांच्या साथीने आजवरचा प्रगतीशील पनवेलचा प्रवास झाला असल्याचे सांगितले. यापुढेही या सर्वांचे सहकार्य मनपास राहावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या वेळी अग्निशमन विभागाच्या दोन अद्ययावत गाड्यांचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे महापालिकेच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात आयुष्यमान कार्ड, आभा कार्ड, अस्थीरोग, कान नाक घसा तपासणी, सर्वसामान्य तपासणी, कर्करोग तपासणी, ईसीजी, एक्स रे, स्त्रीरोग तपासणी अशा विविध तपासण्या करण्यात आल्या.

कार्यक्रमास माजी नगरसेवक अनिल भगत, अरुणकुमार भगत, प्रकाश बिनेदार, बबन मुकादम, माजी नगरसेविका चारूशीला घरत, प्रिती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, सारिका भगत, नीता माळी, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मंगला माळवे, अभिषेक पराडकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहाय्यक संचालक नगररचना केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर आदी उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप महाराष्ट्राच्या लोकधारेमधील विविध गाण्यांच्या माध्यमातून करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी उपायुक्त स्वरूप खारगे (मालमत्ता कर विभाग) यांच्या संकल्पेनेतून व नेतृत्वाखाली स्वराज्याची गाथा शिवराज्याभिषेक या नेत्रदीपक संगीतनाट्याने दिमाखदारपणे करण्यात आली. या संगीत लघुनाट्यामध्ये मालमत्ता कर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या अभिनयाची चुणूक दाखवत उत्स्फूर्त सहभाग दर्शविला.

## पनवेल पत्रकार एकत्रीकरण संस्थेने केंद्रीय मंत्री किंजरापू नायडू यांना दिले निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव कायम व्हावे यासाठी सर्वपक्षीय कृती समितीचे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि दशरथ पाटील यांच्या नेतृत्वात अनेक आंदोलने केली गेली, मात्र याचवेळी स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला झुगारून देण्याचा प्रयत्न काही बाहेरील मंडळी करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सुरुवातीपासूनच 'दिबां'च्या नावासाठी आग्रही असलेल्या भूमिपुत्र पत्रकारांनी आता एकत्र येत विमानतळाला 'दिबां'चेच नाव लागले पाहिजे यासाठी आग्रही भूमिका घेतली. स्थानिक पत्रकारांची मागणीदेखील केंद्र सरकारने लक्षात घेतली पाहिजे, यासाठी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेचे पदाधिकारी दिल्ली येथे जाऊन त्यांनी केंद्रीय नागरी हवाई उड्डाणमंत्री किंजरापू नायडू यांना निवेदन दिले. त्याचबरोबर विरोधी पक्षाचे अर्थात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि खासदार राहुल गांधी यांनादेखील निवेदन दिले.

ना. नायडू यांच्या कार्यालयाकडूनदेखील नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते दि. बा. पाटील यांचे देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक असल्याचे सांगण्यात आले. या वेळी पनवेलमधील पत्रकारांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

## कर्ज घेण्याबरोबरच परतफेडही खातेदारांची नैतिक जबाबदारी -प्रतिभा पाटील



**पेण : प्रतिनिधी**

ज्या सहजतेने आपण बँकेकडून कर्ज उपलब्ध करून देतो तितक्याच जबाबदारीने ते नियमितपणे परतफेड करणे ही कर्जदार व त्यांचे जामिनदार यांची नैतिक जबाबदारी असल्याचे मत पाटणेश्वर अर्बन को. ऑप. बँक लि.च्या अध्यक्षा प्रतिभा पाटील यांनी बँकेच्या २७ व्या वार्षिक सभेत व्यक्त केले.

पाटणेश्वर अर्बन को. ऑप. बँक लि. ची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आगरी समाज हॉल येथे नुकतीच संपन्न झाली. या सभेस बँकेच्या माजी अध्यक्षा सौ.कौसल्याई पाटील,माजी उपाध्यक्ष वसंत आठवले, उपाध्यक्ष शिवाजी पाटील,सल्लागार अँड. प्रशांत पाटील, संचालक रविंद्र म्हात्रे, कृष्णा वर्तक, प्रकाश रामाणे, राजू वाडकर, हिरामण घरत, राजेश रा. मनोरे, गोरखनाथ पाटील, रोहन सोनवणे, संचालक मंडळ, विजय गोरी, व्यवस्थापक बाळ उके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रतिभा पाटील यांनी सांगितले की, गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात ठेवी, कर्जे, गुंतवणूक, खेळते भांडवल, व नफा यामध्ये वाढ झालेली असून कोरोना काळातील आर्थिक मंदी व सरकारी आणि सहकारी बँकांच्या पेण शहरात उघडलेल्या शाखांमुळे बँकिंग व्यवसाय विभागला गेला आहे. तरी सुद्धा पाटणेश्वर अर्बन को. ऑप. बँक हि प्रगतीपथावर वाटचाल करीत असून यावर्षी ५ लाखाची डिव्हीडंडसाठी तरतूद करण्यात आली आहे, हे सांगण्यात आनंद होत आहे

# नवरात्रोत्सवानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून देवी दर्शन







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल आणि परिसरातील विविध मंडळांना भेट देऊन देवीच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेतले.

या भेटीदरम्यान मरी आई मंदिर काळुंद्रे, नवनाथ नगर पनवेल, जरी मरी आई मंदिर तक्का, नॅशनल पार्क तक्का, गुजराती समाज दांडिया पनवेल, खांदा कॉलनी बंगाली समाज दुर्गा पूजा, कुंभारवाडा पनवेल, कळंबोली येथील अमर पाटील मंडळ, तुळजाभवानी माता मंदिर कळंबोली, एकता सि.एच.एस कळंबोली, संग्राक्ष मित्र मंडळ कळंबोली, प्रियदर्शनी सांस्कृतिक सामाजिक विकास मंडळ देवी आंबा माता मंदिर खांदा कॉलनी, दुर्गा माता मंदिर खांदा कॉलनी तसेच शिवशक्ती सेवा मंडळ खांदा कॉलनी यांसारख्या अनेक मंडळांना भेट दिली.

प्रत्येक ठिकाणी देवीच्या मूर्तीसमोर नतमस्तक होत त्यांनी दर्शन घेतले व आयोजकांशी संवाद साधला. मंडळांनीही आमदारांचे वागत करून त्यांना उत्सवातील उपक्रमांची माहिती दिली. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून प्रत्येक मंडळाने देखील विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. आमदारांच्या भेटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आणि भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण, पाहायला मिळाले.







**उलवे : आदिशक्तीचा जागर करणारा पवित्र नवरात्र उत्सव उलवे परिसरात मोठ्या भक्तिपूर्ण आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा होत आहे. या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, वाय.टी. देशमुख, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच विजय घरत, योगिता भगत, किशोर पाटील, सागर ठाकूर, निलेश खारकर, निकिता खारकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप तळोजा शहर गौऱ्या गणपती महिला मंडळ व श्री. निर्दोषदादा केणी प्रतिष्ठानतर्फे तळोजा फेज १ येथे आयोजित नवरात्रोत्सवाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत देवीचे दर्शन घेतले. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, निर्दोष केणी, संतोष भोईर, शुभ पाटील आदी उपस्थित होते.**




**रसायनी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७५वा वाढदिवस आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती यानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान सेवा पंधरवडा अंतर्गत आपटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, बीडीओ वठारकर, पनवेल दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, डॉ. अविनाश गाताडे, जगदीश पवार, ज्ञानेश्वर घरत, संजय टेंबे, आरोग्य अधिकारी खेडेकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)




**जय बजरंग कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, खारकोपर, उलवे नोड (वर्ष २१ वे)**



**पनवेल : भाजपचे युवा कार्यकर्ता जयदीप राजेंद्र भगत यांचे वाढदिवसानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, अशोक ओसवाल, रमेश मुंढे, कामगार जितेंद्र घरत आदींनी अभीष्टचिंतन केले.**



**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांनी दिघाटी येथील दुर्गामाता मित्र मंडळाच्या देवीचे दर्शन घेतले.**

## ओम साई कलावंत मित्र मंडळातर्फे पूरग्रस्तांना २५ हजारांची देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील ओम साई कलावंत मित्र मंडळाच्या वतीने मराठवाड्यातील पूरग्रस्त भागासाठी २५ हजाराची देणगी जाहीर केली आहे. मंडळाचे संस्थापक माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांनी ३० व्या नवरात्रोत्सवात हे जाहीर केले असून विविध मान्यवरांचे आशीर्वाद आणि नागरिकांचे प्रेम लाभत असल्याने कार्यक्रम करण्यात आनंद येत असल्याचे ते म्हणाले.

नवीन पनवेल येथील ओम साई कलावंत मित्र मंडळ गेली ३० वर्षे कार्यरत आहे. मंडळाच्यावतीने नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवले जात असतात. या मंडळाचा नवरात्रोत्सव नवीन पनवेलमधील प्रसिद्ध असा नवरात्रोत्सव आहे. या उत्सवात नवीन पनवेलमधील अबाल वृद्ध आणि विशेष करून महिला वर्ग गरबा खेळण्यासाठी आवडीने येत असतात. या उत्सवाला पनवेलमधील प्रतिष्ठीत व्यक्तींची उपस्थिती लाभते. यावर्षीदेखील हा उत्सव मोठ्या दिमाखात साजरा होत आहे.

यंदा या उत्सवाला लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह विविध मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या उत्सवाला शुभेच्छा देताना देवीचे आशीर्वाद कायम तुमच्यासोबत राहतील आणि नागरिकांचे प्रेम असेच वाढत राहील अशा शुभेच्छा दिल्या. तर मंडळाच्या वतीने मराठवाड्यात अतिवृष्टी झालेल्या ठिकाणी मदत म्हणून २५ हजाराचा धनादेश पनवेलच्या तहसीलदारांकडे देणार असल्याचे संदीप पाटील यांनी जाहीर केले.

मंडळाच्या सामाजिक उपक्रमात दरवर्षी वाढ होत असून नागरिकांचे प्रेम देखील तेवढेच वाढत राहील, असे अध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे नवीन पनवेल मंडळ उपाध्यक्ष नितीन चोरगे यांनी सांगितले.







**पनवेल : सोसायटी मित्र मंडळाने आयोजित केलेल्या झंकार नवरात्रोत्सवाला मंगळवारी दांडिया रसिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन भरघोस प्रतिसाद दिला. या वेळी उद्योजक राजू गुप्ते, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, नीता माळी, अर्चना ठाकूर, भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, चंद्रकांत मंजुळे, देवांशू प्रभाळे, अपूर्व ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी उत्कृष्ट दांडिया खेळणाऱ्या विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.**

## ‘सीकेटी’ची हंसिका कलाल वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर येथे झालेल्या तत्काळ वक्तृत्व स्पर्धेत सीकेटी उच्च माध्यमिक(सीकेटी) विद्यालयाच्या हंसिका जितेशकलाल (बारावी विज्ञान) या विद्यार्थिनीने अतिउपभोग वृत्ती पृथ्वीचा नाश करेल या विषयावर अत्यंत आत्मविश्वासपूर्ण स्पष्ट व प्रभावी भाषण सादर करून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

हंसिकाने मिळवलेल्या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## फुंडे विद्यालयात नवरात्रोत्सव

**उरण :** फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत विद्यालयाचे प्राचार्य बी.बी.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार माझ्या आवडीचा या उपक्रमांतर्गत गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले होते.

दुर्गा मातेच्या मूर्तीचे पूजन विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, उपमुख्याध्यापिका एस.डी थोरात, पर्यवेक्षिका एस.एम बाबर, एस.एस. पाटील व सर्व सेवक वृंदाच्या हस्ते करण्यात आले. उपशिक्षिका के.एम.जितेकर यांनी मंत्र उच्चारण केले. त्यानंतर ज्येष्ठ शिक्षक एस.डी.म्हात्रे व सेवक तसेच विद्यार्थ्यांनी आरती केली.

विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन. पाटील यांनी नवरात्रीचे सांस्कृतिक महत्व उलगडून सांगितले. मुलांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

## संपादकीय

# आरएसएसचे ऐतिहासिक पर्व

भारतीय संस्कृतीत विजयादशमी हा दिवस केवळ धार्मिक उत्सव नाही, तर सत्याचा असत्यावर विजय, धर्माचा अधर्मावर विजय आणि राष्ट्राच्या चिरंतन शक्तीचा उत्सव मानला जातो. रामाने रावणावर विजय मिळवला, दुर्गेने महिषासुराचा संहार केला, त्या विजयोत्सवाच्या स्मरणार्थ दरवर्षी दसऱ्याचा सण साजरा होतो. हाच दिवस निवडून २७ सप्टेंबर १९२५ रोजी नागपूर येथे डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली होती.

**दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर घेतलेले बीज संघ स्थापनेमागील प्रतीकात्मकता ही गूढ व दुरदर्शी होती. विजयादशमी म्हणजे एकात्मतेचा, नव्या आरंभाचा आणि नकारात्मक शक्तींवर विजयाचा दिवस. डॉ. हेडगेवारांनी ठरवले की भारताची गुलामगिरी संपवण्यासाठी, समाजातील भेदाभेद दूर करण्यासाठी आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी यापेक्षा पवित्र क्षण दुसरा असू शकत नाही. त्या दिवशी पेरलेले संघाचे बीज आज शंभर वर्षांनंतर वटवृक्ष झाले आहे. गेल्या शतकात संघाने अनेक वळणे घेतली. स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिका असो वा स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या उभारणीत केलेले योगदान आरएसएसने सतत राष्ट्र प्रथम या भूमिकेवर भर दिला. समाजसेवा, शिक्षण, ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन अशा क्षेत्रांत स्वयंसेवकांचे कार्य ठळकपणे दिसते. आज संघाच्या प्रेरणेने उभ्या असलेल्या संस्था केवळ भारतातच नव्हे; तर परदेशातही भारतीय संस्कृतीचा संदेश पोहचवत आहेत. दरवर्षी विजयादशमीला आरएसएस आपला स्थापना दिवस मोठ्या शिस्तबद्ध कार्यक्रमातून साजरा करतो. स्वयंसेवकांची पथसंचलने, बौद्धिक सत्रे, राष्ट्रगीत-गायन, शस्त्रपूजा अशा कार्यक्रमांतून संघ आपल्या कार्याचा आढावा घेतो व नव्या संकल्पांची पूर्तता करतो. हा उत्सव संघाच्या एकात्मतेचे प्रतीक ठरतो. आज शतकपूर्तीनंतर संघासमोर नवी आव्हाने उभी आहेत ती म्हणजे तंत्रज्ञानामुळे बदलणारे जीवन, जागतिकीकरणामुळे निर्माण होणारे सांस्कृतिक दडपण, पर्यावरण संकटे, सामाजिक असमानता व नवे संघर्ष. या सर्वांवर मात करत भारतीय समाजात समरसता, स्वदेशी आत्मनिर्भरता आणि सांस्कृतिक आत्मविश्वास रूजवणे हीच संघाची पुढील दिशा असणार आहे. ज्याप्रमाणे विजयादशमी हा धर्म व संस्कृतीच्या विजयाचा सण आहे, त्याच भावनेतून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपला प्रवास सुरू केला. आज शंभर वर्षांनंतरही संघाचे ध्येय तेच आहे एकात्म, समर्थ आणि आत्मभिमानी भारताची निर्मिती. संघाची ही शताब्दी केवळ एका संस्थेचा उत्सव नाही, तर भारतीय संस्कृतीच्या अदम्य शक्तीचा, सत्य-असत्याच्या संघर्षात मिळालेल्या विजयाचा उत्सव आहे. गेल्या शतकात संघासमोर अनेक रावण उभे राहिले... ब्रिटिश साम्राज्याचे दडपण, स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय संघर्षांची वादळे, समाजातील जातिभेदाचे विष, परकीय संस्कृतीचा आंधळा पगडा, पण प्रत्येक संकटावर संघाने रामबाण उपाय शोधला. स्वयंसेवकांनी समाजसेवेच्या शस्त्राने, शिस्तीच्या धनुष्याने आणि राष्ट्रभक्तीच्या बाणाने या रावणांना पराभूत केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शंभर वर्षांचे पर्व म्हणजे केवळ इतिहासाचा सोहळा नाही, तर नव्या विजयाचा आरंभ आहे. दसऱ्याचा संदेश नेहमी एकच राहतो की, सत्याचा विजय होतोच, असत्याचा पराभव ठरलेलाच असतो. आज संघाच्या शताब्दी निमित्ताने हा संदेश अधिक ठळकपणे उमटतो राष्ट्रासाठी जगू या, समाजासाठी समर्पित होऊ या आणि भारताला विश्वगुरू बनवू या...**

# मोरे गावची शिवकालीन मोरबाई देवी

मुरुड तालुक्यातील निसर्गरम्य मोरे गाव समुद्राच्या कुशीत वसलेले आहे. गावातील जुनी लोक सांगतात की, शिवकालात मुरूडला नवाबचे राज्य होते. नवाबाकडे कामाला असणार्या शेतकर्यांना मोरे गावची जमीन कसायला देण्यात आली. नंतर पुढील पिढीत वाढत वाढत गाव तयार झाला. ह्या गावच्या विशाल समुद्रकिनारी उंच डोंगर आहे .आणि त्या डोंगरावर ३०० वर्ष परंपरा असलेली मोरबाई देवीचे सुंदर मंदिर आहे .

ह्या मंदिरातून देवीचे लक्ष समुद्राकडे असल्याने समोर जंजिरा किल्ला व शिवरायानी बांधलेला पदमदुर्ग किल्ला दिसतो म्हुणुनच देवीची मूर्ती शिवकालीन असल्याचे म्हटले जाते, मंदिराचा परिसर १०० फूट उंच असल्याने मंदिराच्या गाभाऱ्यातून समुद्रात २ किल्ले जवळ जवळ दिसतात. पर्यटक मंदीराच्या गाभाऱ्यात येताच मन भारावून टाकणारे चित्र पाहायला मिळते. विशाल समुद्र सोसाट्याचा वारा आणि मंदिरातील शांतता पर्यटकांना आवडते येथे विविध





सिनेमाची चित्रीकर अनेक वेळा झाले आहे, परंतु मंदिराकडे जाणारा रास्ता खराब असल्याने पावसाळी पर्यटकाना खूप त्रास होतो. ताळदेव चढणी पासून मंदिर पर्यंत नवीन रस्ता होण्याची गरज आहे अशी मागणी मोरे गावचे ग्रामस्त करत आहेत. लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज आहे

मोरे गावचा इतिहास मोठा रंजक आहे, ह्या गावातील १०० लोक कष्टाळू आणि गवंडी कामात कुशल आहेत तर महिला शेती व्यवस्यात कुशल आहे. गणपती व नवरात्र उत्साहवत मुरूड शहराला विविध प्रकारची फुले ह्या गावच्या महिला पुरवतात, गोंडायच्या फुलांच्या अनेक बागा आहे, सकाळी ५ वाजता फुले गोळा करून १० किमी चालून मोरे गावच्या महिला मुरुड शहरात सकाळी ७ वाजता विकण्यास येतात हि प्रथा १०० वर्ष सुरु आहे. गावात जाण्यासाठी डोंगर चढून जावे लागते .खूप कष्टाचे काम आहे गेली अनेक पिढ्या ते करत आहेत

चित्र महिन्यात मोरे देवीचा मोठा उत्सव होतो, पारंपरिक वेष घालून परंपरा नृत्य पाहायला मिळते. शक्ती तुरा नाचाची मंडळी परंपरा सुरु आहे. गावचे ग्रामस्त स्वकष्टाचे आजचे मंदिर बनवले आहे .मंदिर पर्यन्त चा रास्ता करण्यासाठी संपूर्ण गाव पर्यत्न करतोय.रास्ता झाला तर पर्यटक मोट्या संख्येने येतील व गावातील तरुणाला व महिलांना रोजगार निर्माण होऊ शकतो गावचे माजी सरपंच म्हणले गावकर्यांनी स्वतः पसे काढून देवीची नूतन पाषाण मूर्ती बनवली आणि विविध निसर्ग्रेमींनी लोकांनी देणग्या दिल्यात शासनकाढून निधी मिळण्याची गरज आहे. गावात जाणारा रास्ता व देवीच्या मंदिराकडे जाणारा रास्ता खूप खराब असल्याने गावकरी व पर्यटकांना त्रास होतो. त्याची डागडुजी करावी.

**-सुधीर नाझरे,** मुरूड

# ऐतिहासिक चौल येथील चंपावती देवी

रायगड जिल्हातील अलिबागच्या दक्षिणेस १८ किलोमीटर असलेल्या चौलमध्ये वाघजाईच्या डोंगरातील सातवाहन काळातील लेणी त्या काळाचे चौलशी नाते दाखवते. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी उदयास आलेले हे बंदर पोर्तुगीजाचे महत्वाचे ठाणे, निजामशाही, आदिलशाही, आणि मराठेशाही जवळून पहाणारे नगर होते...! येथे ३६० मंदिरे व तितकेच तलाव असा इतिहास या ठिकाणी आहे. चंपावती नगर अशी ख्याती असलेले चौलची ऐतिहासिक काळापासून दक्षिण काशी अशी ओळख सांगितली जात असे.

चंपावती आळीत भव्य चंपावती देवीचे मंदिर आहे. हे मंदिर सुमारे चारशे वर्षापुर्वीचे असावे असे सांगितले जाते, या देवीला 'कालिकामाता' या नावाने सुध्दा ओळखतात. ऐतिहासिक काळात मंदिर परिसरात फक्त सोनचाफ्याची झाडे होती. त्यामुळेच या देवीला चंपावती हे नाव पडले असावे असा जाणकार मंडळी सांगतात. ही चंपावती देवी साहनी कुटूंबाची कुलदैवत आहे. या देवस्थानाचा जिर्णोध्दार १५ जुन १८७२ साली झाला, असा उल्लेख आंग्रेकालीन अष्टागर या पुस्तकात आढळतो. त्यानंतर साहानी कुटूंबियाचे आध्यपुरूष पुण्यश्लोक परलोकवासी जनार्दन राघोबा वनमाळी (साहानी) यांनी कुळस्वामीनीच्या देवळाची दुरूस्ती करून देवालयास सुखरूप आणले. त्यानंतर इ.स.१९६७ साली झालेल्या कोयना भुकंपात या देवस्थानाची थोडीफार नुकसानकी झाली. त्यावेळी कै. ब.खंडेराव स.साहानी, आर्किटेक्ट कै. गजानन ज.साहानी व वसंत बाळाराम साहानी (चिटणीस) या सर्वाच्या मार्गदर्शनातून मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी दैनिक फंड योजना अंमलात आणली. एप्रिल १९७४ मध्ये आर्किटेक्ट कै. गजानन ज.साहानी यांनी देवस्थानाच्या



दक्षिणेस लागून पुजाराकरीता असलेली झापाची पडवी मोडून पक्के बांधकामाची पडवी स्वखर्चाने केली व जयवंत साहानी यांनी काही वर्षापुर्वी देवालयातील देवी समोरचा चोल स्वखर्चाने मार्बलने आच्छादीत केला.. साहानी कुटूंबियांनी सन २००३ मध्ये सिमेंट क्रॉकिटच मंदिर बांधून भव्य कळसासह जिर्णोध्दार केला. हल्ली मंदिराची मालकी श्रीमती महानंदा नाईक यांच्याकडे असून त्या पुजाअर्चा करतात. उत्सवाचे दिवशी चंपावती मातेस मुखवटा व दागिन्यांनी सजवण्यात येते. या मंदिराच्या गाभार्यात श्री हनुमान, दत्तमुर्ती, व गणपतीची मुर्ती आहे. या मंदिरात कोळी, माळी, गुजराती समाजातील कुटूंबिय मोठया प्रमाणावर दर्शनाला येतात. साहानी कुटूंबियांनी सन २०१० मध्ये मुर्तीला वज्रलेप केला आहे.

या देवीवर कोळी लोकांची अपार श्रध्दा असून या देवीची आख्यायिका सांगितली जाते. एक मच्छिमार गलबत घेवून मच्छीमारी करण्यासाठी खोल समुद्रात गेला आणि अचानक वादळ-वारा सुरू झाला. उधाणाच्या प्रकाराने मच्छीमार भयभीत झाला. त्यांने चंपावतीमातेचे स्मरण केले आणि तिच्या जवळ नवस (साकडे) केला की, या उधाणातून वाचून किनार्यावर मी माझे गलबत घेवून लागलो, तर परस्पर घरी न जाता तुला एक हजार रूपये किमंतीचे सोनचाफ्याची एक हजार रूपयांची फुले वाहीन, असा नवस बोलल्यावर काही तासातच तो किनारावर सुखरूप गलबतासह परत आला.त्यावेळी दुपार झाली होती. त्याने बाजारात फुले खरेदी करण्यासाठी धाव घेतली खरी, पण कुठेच फुले शिल्लक नव्हती. तेथेच एका वृध्द महिलेकडे सोनचाफ्याच्या फुलांची पाकळी कंरडीत होती. ती वृध्द महिला ती पाकळी फुकट देत असताना सुध्दा तिला पैसे देवून विकत घेवून मंदिर गाठले. चंपावती मातेच्या पाया पडला, आणि मला सुखरूप तुझाजवळ आणलेस,पण मला फुले मिळाली नाहीत,ती पाकळी तु फुले समजून स्विकार कर, आणी मला क्षमा कर, असे म्हणत ती पाकळी चंपावती मातेस वाहीली. त्याच क्षणी चंपावती मातेने मान वाकवून कळा दिला. आजपर्यत चंपावती मातेची मान तशीच आहे. यामुळे या चौलची चंपावती देवी नवसाला पावणारी चंपावती देवी म्हणून ओळखली जाते.

**-महेंद्र खैरे,** रेवदंडा



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅपमध्ये चॅट उघडताच होते ग्रीन स्क्रीन

तुम्ही जर व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन वापरत असाल तर तुम्हाला सावधान राहण्याची आवश्यकता आहे. पच्या बीटा २.२४.२४.५ व्हर्जनमध्ये एक मोठा बग समोर आला आहे. या बगमुळे युजर्सच्या फोनची स्क्रीन पूर्णपणे ग्रीन म्हणजेच हिरव्या रंगाची होत आहे. ही समस्या विशेषतः हजारो Android युजर्सना येत आहे. iOS बीटा टेस्टर्सना सध्या अशा कोणत्याही समस्येचा सामना करावा लागत नाही.



व्हॉट्सअॅप वापरणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. त्यामुळे त्यामध्ये नेहमीच नवनवे फिचर येत असतात, मात्र सर्वच फिचर सक्सेक होतात असे नाही. काही अपडेटमुळे धोकाही निर्माण होऊ शकतो. अशावेळी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

युजर्स चॅट किंवा मेसेज उघडण्याचा प्रयत्न करताच, स्क्रीन अचानक ग्रीन होते. अॅप बंद होईपर्यंत संपूर्ण स्क्रीन ग्रीनच दिसते. हजारो युजर्सना या समस्येचा सामना करावा लागत आहे. या समस्येबद्दल, काही युजर्सनी ट्विटरवरदेखील पोस्ट केली आहे. व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जन योग्यरित्या काम करत नाही आणि व्हॉट्सअॅप वापरताना स्क्रीन पुन्हा पुन्हा ग्रीन होते. मात्र, या समस्येबाबत मेटाकडून अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

**'असा' सोडवा प्रॉब्लेम**

सध्या ही समस्या व्हॉट्सअॅपच्या स्टेबल व्हर्जनमध्ये नाही. ही समस्या सोडवायची असेल तर काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.

* व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जनवरून स्टेबल व्हर्जनवर स्विच करा. यामुळे तुमचं व्हॉट्सअॅप पूर्णपणे सुरक्षित होईल.
* शक्य असल्यास, व्हॉट्सअॅप वेब किंवा लॅपटॉप, टॅबलेट किंवा आयफोनसारख्या इतर सर्व उपकरणांवर वापर करा. याच्या मदतीने तुम्ही बग टाळू शकता
* व्हॉट्सअॅप अनइन्स्टॉल करून पुन्हा इन्स्टॉल करा, परंतु हे करण्याआधी Google Cloud वर तुमच्या मेसेजचा बॅकअप घ्यायला विसरू नका, जेणेकरून तुमचे चॅट्स सुरक्षित राहतील.
* मेटा समस्येचे निराकरण करेपर्यंत तुम्ही वाट पाहू शकता.

# शिल्पकार विनायक करमरकर



## निमित्त

विनायक पांडुरंग करमरकर ऊर्फ नानासाहेब करमरकर हे मराठी शिल्पकार होते. आज त्यांचा जन्मदिन (२ ऑक्टोबर १८९१) आहे. मुंबईच्या सर जे.जे. कला विद्यालयात ते शिल्पकला शिकले. शिल्पकलेतील योगदानाबद्दल भारतीय केंद्रशासनाने इ.स. १९६२ साली त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवले. ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांसाठी प्रसिद्ध आहेत.

अलिबागजवळील सासवणे गावात त्यांच्या घरी शिल्पकारांचे करमरकर संग्रहालय उभारण्यात आले आहे. अलिबाग-रेवस रोड येथून १८ किमी अंतरावर स्थित एक संग्रहालय आहे जिथे कै. नानासाहेब करमरकर यांनी बनवलेले शिल्पकार त्यांच्या स्वतःच्या बंगल्यात प्रदर्शित केले आहेत. येथे सुमारे १५० सुंदर कोरीव शिल्पे प्रदर्शित आहेत.

भारतातील वास्तववादी शिल्पकारांमधील अग्रगण्य शिल्पकार म्हणून महाराष्ट्रातील नानासाहेब ऊर्फ विनायक पांडुरंग करमरकर ख्यातनाम आहेत. अश्र्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा ब्राँझमधील साडेतेरा फूट उंचीचा एकसंध पुतळा त्यांनी घडवला. अशा प्रकारचा पुतळा घडवणारे ते भारतातील पहिले शिल्पकार ठरले. सजीवता आणि सादृश्यता ही त्यांच्या शिल्पांतील वैशिष्ट्ये मानली जातात.

करमरकरांचा जन्म इ.स. १८९१ साली महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील सासवणे इथे झाला. समुद्रकिनारी वसलेल्या या गावातच त्यांच्या वडिलांचा गणपतीच्या मूर्ती बनवण्याचा उद्योग होता. त्यामुळे चित्र काढण्याचा नाद असलेल्या करमरकरांना मूर्ती घडवण्याचेही शिक्षण घरीच मिळाले. गावातील देवळाच्या भिंतीवर त्यांनी काढलेले शिवाजी महाराजांचे चित्र पाहून ऑटो रॉथफिल्ड या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्याने पुढाकार घेऊन त्यांना मुंबईच्या जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल केले.

मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर त्यांनी कलकत्ता इथे स्टुडिओ थाटून व्यावसायिक कारकिर्दीला सुरुवात केली. त्या काळात त्यांनी रवींद्रनाथ टागोर, चित्तरंजनदास, महात्मा गांधी, पी.सी. रे प्रभृतींची व्यक्तिशिल्पे घडवली.

विठ्ठलभाई पटेल, आचार्य कृपलानी, ऑटो रॉथफिल्ड यांच्या पुतळ्यांसह त्यांची 'मत्स्यगंधा', 'मोरू' ,'प्रवासी', नमस्ते' आदी शिल्पेही लक्षणीय ठरली. याव्यतिरिक्त करमरकरांनी भारतातील अनेक संस्थानिक व त्यांच्या घराण्यातील व्यक्तींचीही शिल्पे घडवली.

'नानासाहेब' या आदरार्थी संबोधनाने परिचित असलेल्या करमरकरांचे कौशल्य लक्षात घेऊन १९४९ साली त्यांना अमेरिकेच्या विस्कॉन्सिन विश्र्वविद्यालयात प्रात्यक्षिकाकरिता निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या शिल्पकलेतील योगदानाचा गौरव म्हणून भारत सरकारने १९६२ साली त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले. तसेच १९६४ साली ललित कला अकादमीने त्यांना फेलोशिप देऊन त्यांचा यथोचित गौरव केला.

१९३०च्या दशकात रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीजवळील वाघ्या कुत्र्याच्या पुतळाही करमरकरांनी बनवला होता. या थोर शिल्पकाराचे १९६६ साली म्हणजे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. अलिबाग ते मांडवा रस्त्यावर आवास फाट्यापासून तीन किमी अंतरावर नानासाहेब करमरकर शिल्पालय आहे. हे सासवणे गावात आहे. येथे सुमारे दोनशे कलाकृती आहेत. सुहास बहुळकर यांनी 'शिल्पकार करमरकर' या नावाचे चरित्र लिहिले आहे. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# घरच्या घरी अशा करा कॅलरीज बर्न

चालणे हा ताण कमी करण्याचा उत्तम मार्ग आहे. चालणे हा एक व्यायामाचा उत्तम प्रकार मानला जातो, ज्यामुळे शरीराला असंख्य फायदे मिळतात. रोजच्या चालण्यामध्ये सातत्य ठेवल्याने मानसिक स्वास्थ्यदेखील सुधारते. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पायी चालण्यासाठी तुम्हाला निश्चित अशी वेळ ठरवण्याची काहीच गरज पडत नाही. दरम्यान, चालताना तुम्ही दररोज किती पावले टाकली पाहिजेत आणि चालताना कोणत्या प्रकारचे पाऊल उचलले पाहिजे तसेच त्याचे अनेक फायदे आज आपण जाणून घेऊयात.




जे लोक वर्क फ्रॉम होम करतात तसेच पावसाळ्यात ज्यांना घराबाहेर पडता येत नाही अशा लोकांनी घरातच कशा प्रकारे चालले पाहिजे या संदर्भात बंगळुरूमधील स्टर व्हाईटफिल्ड हॉस्पिटलचे मुख्य फिजिओथेरपिस्ट डॉ. राजाराम एम यांनी माहिती दिली आहे. जर तुम्ही रोज फिरायला जाऊ शकत नसाल, पण तुम्हाला चालायचा व्यायाम करायचा असेल आणि वजन कमी करायचे असेल तर तुम्ही हा वर्कआउट करून पाहा.

३० सेकंदांसाठी उभे राहून पाय लांब करणे, ३० सेकंद एका जागेवर उड्या मारणे, ३० सेकंद पायाच्या बोटांवर उभं राहून गुडघे उंच करा, खाली वाकणे पुन्हा वर येणे. ३० सेकंद एकाच जागेवर हळू हळू धावा, एकदा उजव्या बाजूला एकदा डाव्या बाजूला खाली वाका. अशा प्रकारचा व्यायाम तुम्ही घरबसल्या करू शकता. प्रत्येक व्यायाम १० फेऱ्यांसाठी पुन्हा करा. यामुळे तुम्ही सहज कॅलरी बर्न करू शकता.

अशा प्रकारचे साधे व्यायाम किंवा हालचाली सक्रिय होण्यासाठी एक चांगली सुरुवात आहे, परंतु हे समजून घ्या की साधे व्यायाम कठीण वर्कआउटची जागा घेऊ शकत नाहीत. शारीरिक तंदुरुस्तीसारखी दीर्घकालीन आरोग्य उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समतोल राखणे आवश्यक आहे. डॉ. राजाराम यांच्या मते, यांसारख्या छोट्या छोट्या आणि साध्या व्यायामाचा फायदा होऊ शकतो, मात्र निरोगी जीवन जगण्यासाठी शरीराला अधिक चांगल्या प्रकारच्या वर्कआउट्सची गरज असते.

आरोग्य तंदुरुस्त ठेवण्यासाठी चालणे चांगले आहे. यामुळे तुमचे शरीर सक्रिय राहते आणि अन्नाचे पचन व्यवस्थित होते, ज्यांना मधुमेह आहे त्यांनी रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी सतत चालावे. ताणतणाव, चिंता, झोप न लागणे, एकाग्रता नसणे इत्यादी गोष्टी यामुळे दूर होतात. चालण्याने रक्तदाब नियंत्रित राहतो व डोळ्यांसाठीही हे फायदेशीर आहे.

# खोपोली पालिकेने शास्ती अभय योजना लागू करावी

## भाजप शिष्टमंडळाची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

येथील नगरपरिषद हद्दीतील कर धारकांना व मालमत्ता कर धारकांना शास्ती अवय योजना लागू करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी खोपोली भारतीय जनता पक्षाने नगरपरिषद मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील यांना निवेदन देऊन केली आहे.

राज्य शासनाने १९ मे २०२५ रोजी परिपत्रक काढून मालमत्ता करावरील दंड माफ करण्या च्या सूचनासह अभय योजना लागू करण्याचा निर्णय घेतला होता ,परंतु कर्जत नगर परिषदेला या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे ,या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष खोपोली शहर यांच्या वतीने युवा नेते विक्रम साबळे यांच्या नेतृत्वाखाली आज बुधवारी मुख्याधिकारी व प्रशासक डॉक्टर पंकज पाटील यांना याबाबतचे निवेदन देऊन येथील नागरिकांना दिलासा द्यावा अशी विनंती करण्यात आली आहे.

यावेळी कर्जत खालापूर समन्वयक हेमंत नांदे, महिला अध्यक्ष अश्विनी अत्रे, माझी सरचिटणीस अजय इंगुलकर,माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, माजी अध्यक्ष रमेश रेटरेकर, कामगार आघाडी शेलचे अनिल कर्णूक, व्यापारी सेलचे कीर्ती ओसवाल, माझी युवक अध्यक्ष संजय कचरे, संतोष ढोकळे, अपर्णा साठे, विभा पाठक यासह पदाधिकारी उपस्थित होते.



**नागोठणे : भाजप नेते प्रकाश देसाई यांनी श्री जोगेश्वरी माता, श्रीकृष्ण साईबाबा मंदिर केएमजी, कानिफनाथ मंदिर येथील नवरात्र उत्सवात जाऊन दर्शन घेतले. त्या वेळी स्वागत व सन्मान करताना मान्यवर.** (छाया : धम्मशील सावंत)


## कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्री. शांताराम अहिलाजी पठारे रा. मोराज एल-२ एल ३ टाईप को. ऑप हौसिंग सोसायटी लि. फ्लॅट क्र. २०३ , तक्का रोड पनवेल, जि. रायगड

माझेकडून पनवेल परिसरात प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ०७५६/२०२५ दिनांक. १२/०३/२०२५ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. शेअर सर्टिफिकेट- क्र.३१ शेअर नं १०६ ते १३०

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९९६७२६७४३० वर क्रमांकावर संपर्क साधावा.

**दिनांक :- ०१/१०/२०२५**

**सही/-**
**श्री.शांताराम अहिलाजी पठारे**
**तक्का- पनवेल**


# आदर्श पतसंस्थेची जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर झेप

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था ९३५ कोटी रुपयांचा एकत्रीत व्यवसायाचा पल्ला गाठून रायगड जिल्ह्यात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचा गुरुवारी (दि.२) २७ वा वर्धापन दिन आहे. त्यापूर्वीच आदर्शने ९३५ कोटी रुपयांचा एकत्रीत व्यवसायाचा पल्ला गाठून जिल्ह्यात अव्वल क्रमांकावर झेप घेतली. त्या निमित्त बुधवारी ( दि. १) आदर्श भवन येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांनी ही माहिती दिली.



१००० कोटी रुपयांचा एकत्रीत व्यवसाय करण्याचा संकल्प आम्ही मार्च २०२५ मध्येच केला होता. त्यामुळे वातावरण निर्मिती झाली. हे उदिष्ट गाठण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम केले. म्हणून ९३५ कोटींचा पल्ला गाठला. मार्च २०२६ पर्यंत १००० कोटी रुपयांचा एकत्रीत व्यवसायाचा पल्ला आम्ही नक्की गाठू. हे करत असताना कसलीही तडजोड करणार नाही, असे सुरेश पाटील यांनी यावेळी सांगितले.

कोणत्याही आर्थिक संस्थेची प्रगती तिच्या ग्राहकांच्या विश्वासावर अवलंबून असते. आदर्श पतसंस्थेने ग्राहकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे . त्यामुळे या पतसंस्थेने रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर झेप घेतली आहे. हा प्रथम क्रमांक टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील, असे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी म्हणाले.

दत्ता पाटील क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद पाटील, वात्सल्य ट्रस्टच्या अध्यक्ष शोभा जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, उपाध्यक्ष कैलास जगे , संचालक सतीश प्रधान, रामभाऊ गोरीवले, संजय राऊत, ॲड. वर्षा शेठ, ॲड. रेश्मा पाटील, विलाप सरतांडेल, डॉ. मकरंद आठवले, ॲड. आत्माराम काटकर मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. मीनाक्षी पाटील आदी.मान्यवर यावेळी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकतीचे क्षेत्र त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर जमीनीचे सह मालक/कब्जेदार याने आमचे अशिलांकडून खालील उल्लेखीत जमीनीचे क्षेत्र ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा स्विकारुन लेखी करार केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे केवाळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| गणा बळीराम गायकर, नाना बळीराम गायकर, हरी बळीराम गायकर, बाजीराव बळीराम गायकर, वंदना माया गायकर, मिलिंद दामु गायकर, जयाबाई दामु गायकर, वंदना शिवदास पाटील, रंगनाथ वसंत म्हात्रे, निता चंद्रकांत घरत व मिननाथ वसंत म्हात्रे | ३५ | ४ | ०-४४-८० | ५.७५ |

वर नमूद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिंच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द् झाले पासून २१ दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत. अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन, आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग, मागाहून मुदतीनंतर उपस्थीत करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ठिकाण - पनवेल.**
**दिनांक ०२/१०/२०२५.**

**सही/-**
**कुलदीप आर पाटील**
**ॲडव्हकेट**

**सही,**
**कार्यालयिन पत्ता:**
**फ्लॅट नं. ६०३, बी- विंग, साई सत्यम रेसिडेंन्सी,**
**प्लॉट नं. २०, सेक्टर नं. ०४, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल नं. ८१०८९८६५८८/९३२६४२४०६३.**


# वासरंग-चिंचवली रस्त्यावरील साकव खचला

**खोपोली : प्रतिनिधी**

वासरंग-चिंचवली रस्त्यावरील लवजी या ठिकाणी असणारा साकव खचल्याने या रस्त्यावरील वाहतूक धोकादाय झाली आहे. सुमारे ५० वर्षांपूर्वीचा हा साकव असल्याचे सांगण्यात येत आहे.

गुडलक कॉर्नरकडून वासरूंग मार्गे लवजी, चिंचवली, शेडवली व पुढे मुंबई पुणे जुन्या महामार्गाला हा रस्ता जोडला जातो. या रस्त्यावरून सतत वाहतूक सुरू असते. त्याचप्रमाणे नवघर सेनगाव येथून खडीमशीनचे डंपर या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात जात असतात, विशेषतः रेल्वे स्टेशन लगतचा रस्ता असल्यानेही या रस्त्यावरून दिवस रात्र वाहतूक सुरू असते, असा हा महत्त्वपूर्ण रस्त्यावरील साकव खचल्याने या रस्त्यावरील वाहतूक थांबवावी लागत आहे.



नगरपरिषदेने या रस्त्यावर बॅरिगेट लावले असतानाही वाहन चालक याच रस्त्यावरून वाहतूक करीत आहेत. विशेषता चार चाकी वाहनांना प्रवेश करू नये अशी सक्त ताकीद प्रशासनाने दिली असतानाही वाहन चालक जुमानत नसल्याचे पहावयास मिळत आहे. पर्यायी रस्त्याचा डीपी रोड मार्गे प्रवास करावा अशी सूचना नगरपरिषदेने केली आहे. हा साकव तातडीने दुरुस्त करावा अशी मागणी या परिसरातील नागरिक करीत आहे. या पुलाची तातडीने पाहणी करून दुरुस्ती तातडीने सुरू करणार आहोत वाहन चालकानी पर्यायी रस्त्याची वापर करण्याबाबतही फलक लावून आम्ही आवाहन केले आहे.

# ॲड. राजीव साबळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोकण विभाग संघटक आणि प्रवक्तेपदी

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माणगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांची विविध पदांच्या नियुक्तींचे दीर्घ प्रतीक्षा अखेर संपली आहे. अनेक दिवसांपासून रखडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या अखेर सोमवार, दि. २९ सप्टेंबर रोजी येथील कुणबी भवन येथे खा. सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विस्तारीत कार्यकारिणीच्या बैठकीत जाहीर करण्यात आल्या. या महत्त्वपूर्ण बैठकीत ॲड. राजीव साबळे यांची कोकण विभाग संघटक तसेच मुख्य प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र राज्य या पदांवर नियुक्ती करण्यात आली.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस दक्षिण रायगड कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, तालुका अध्यक्ष काका नवगणे, राजू शिर्के, योगिता चव्हाण, यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# भातपिकाला करपा रोगाची शक्यता बळावली

**मुरुड : प्रतिनिधी**

समाधानकारक पाऊस पडल्याने शेतकरीवर्ग जरी सुखावला असला तरी अतिपावसामुळे भात पिकाला करपा रोगाची लागण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुरुड तालुक्यामध्ये सुमारे ३२०० हेक्टर भात क्षेत्र लागवडी खाली असून सर्वच शेतकरी भात पीक मोठ्या प्रमाणत घेत असतात. मुरुड तालुक्यातील शेतकरी मुख्यत्वे करून जया ,सुवर्णा, रूपाली, शुभांगी, चिंटू ,वाडा कोलम इत्यादीभात वाणांचे उत्पादन घेत असतात.तसेच पाणथळ तसेच खार जमिनीत नवीन संशोधित केलेल्या पनवेल-१, २,३ या वाणांची लागवड केली जाते . उथळ किंवा उखारू जमिनीमध्ये हळव्या वाणांची लागवड पारंपारिक पद्धतीने केली जाते .



मुरुड तालुक्यात सर्वात जास्त भात पीक घेतले जाते.मुरुड तालुक्यात ३९०० हेक्टर क्षेत्रात भात पिकाची लागवड केली जाते.भात पीक हे संपूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबुन असते. यंदा पावसाची सुरुवात मे महिन्याच्या २० तारखेला झाली.तो सुद्धा पाऊस मुसळधार पडला.मुरुड तालुक्यात फक्त मे महिन्याचा पाऊस ५५० मिलीमीटर पेक्षा जास्त पडला आहे.परंतु शासकीय नियमानुसार १ जून पासून जो पाऊस पडेल तोच पावसाचे मोजमाप केले जाते.त्यामुळे मे चा पावसाचे जरी मोजमाप केले नाही तरी जुने ते सप्टेंबर पर्यतचा मुरुड तालुक्यात ऐकून पाऊस हा आतापर्यत २५८४ मिमि पावासाची नोंद झाली आहे.

यंदा सर्वात जास्त पाऊस आणि तो सुद्धा सप्टेंबर अखेरपर्यंत पडल्याने भात शेती मध्ये पाणीच पाणी दिसून येते.भात पिकाला मुबलक पाणी मिळाल्याने भात पिकावर काही ठिकाणी करपा रोगाची लागण झाल्याचे दिसून येत आहे.भाताची लोम तयार होण्याची प्रक्रिया सुरु झाल्याने अति पावसाचे प्रमाण भात पिकास घातक ठरू पहात आहे. पावसाने आता विश्रांती घ्यावी उन्ह पडावे अशी माफक अपेक्षा शेतकरी वर्ग करीत आहेत. हवामान बदलामुळे यंदा जर ओक्टोम्बर मध्ये पाऊस पडला तर तयार झालेले भात पीक नष्ठ होण्याच्या मार्गावर आहे.

किसान क्रांती संघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्रीधर जंजिरकर यांनी सांगितले की, सतत पडणाऱ्या पावसामुळे भात पिकाच्या लोंब्या फुटत नाही त्यामुळे भात तयार होण्यासाठी कडक सूर्यप्रकाशाची आवश्यकता आहे. परंतु ढगाळ वातावरण व पडणारा पाऊस यामुळे येथील शेतकरी अडचणीत आला असून शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा अशी मागणी केली.

# दसऱ्यानिमित्त झेंडू फुलांनी बाजार बहरला

**अलिबाग :** दसरयाच्या पूजेसाठी झेंडूच्या फुलांना मोठी मागणी आहे. त्यामुळे बाजारात झेंडूची आवक वाढली आहे. सध्या बाजार पिवळया धम्मक आणि केशरी रंगांच्या झेंडूफुलांनी बहरला आहे. मात्र पाऊस आणि त्यानंतरची पूरस्थिती यामुळे झेंडु कुजल्याने अपेक्षित उत्पादन झाले नाही सध्या झेंडूचे दर कडाडले आहेत. परीणामी भाविकांच्या खिशाला चाट बसते आहे.

या वर्षी पावसाचा मुक्काम लांबल्याने झेंडूच्या फुलांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यातच मागील आठवडयात राज्याच्या अनेक भागात पूरस्थिती होती. यात फुलशेती कुजून गेली. यात शेतकरयांचे अतोनात नुकसान झाले आहे. उत्पादन कमी झाल्याने झेंडूचा भाव वधारला आहे. प्रतिवर्षी १२० ते १५० रुपये किलोने मिळणारा झेंडू यावर्षी २०० रुपये पार झाल्याने भाविकांमध्ये नाराजी आहे, मात्र पूजेसाठी आवश्यक असणारी फुले कमी प्रमाणात का होईना ग्राहक खरेदी करताना दिसत आहेत.

अलिबागच्या मुख्य बाजारपेठेत बुधवारी झेंडू फुलांच्या खरेदीसाठी नागरीकांनी गर्दी केली होती. नाशिवंत माल असल्याने सणाची संधी साधत शेतकरयांनी मोठया प्रमाणावर झेंडूची काढणी केली आहे. अलिबाग शहरातील बाजारपेठ तसेच रस्त्याच्या कडेला झेंडूच्या फुलांचे ढीग पहायला मिळत आहेत.




## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन - ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई-मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**जा.क्र. : कुबनप/साबां/२०८३/२०२५-२६** **दिनांक :- ०१/१०/२०२५**

### जाहिर ई- निविदा सूचना क्र.६१/२०२५-२०२६

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत नगरपरिषद हद्दीतील १३ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.२/१०/२०२५ ते दि. ९/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि. २०२५ रोजी दुपारी. १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि. १०/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी तथा**
**प्रशासक**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**



Exh.8
ॲड. नित्यानंद ठाकुर

## जाहीर नोटीस

**बेलापुर येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात.**

दिवाणी चौ. अर्ज क्रं. ८१२/२०२५.
पु.ता. २७/१०/२५

१. श्रीमती अनुसया अंबाजी सुर्वे
वयः ७९ वर्षे, धंदाः गृहिणी
२. श्री. श्रीकांत अंबाजी सुर्वे
वयः ४६ वर्षे, धंदाः नोकरी
रा. शिवाजी नगर वसाहत, रूम नं. १८-१/१, डॉ.ए.बी. रोड, गॅस्को कंपनी समोर, वरळी, कॉलनी, एस.ओ.मुंबई, महराष्ट्र, ४०००३०.
३. सौ. योगिता सुरेश कलमास्ते
वयः- ५१ वर्षे, धंदाः गृहिणी
रा. गावदेवी फिल्टर पाडा, आरे कॉलनी रोड, विकास मेडिकल जवळ, पवई, अंधेरी ईस्ट, मुंबई ४०००८७
४. सौ. उर्मिला प्रविण बाळगोडे
वयः- ५६ वर्षे, धंदाः- गृहिणी रूम नं. बी- ४०, वृंदावन सोसायटी, तळेगाव, चाकण रोड, वतननगर, तळेगाव स्टेशन, तळेगाव दाभाडे, जी.एच मावळ, पुणे ४१०५०७
— अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ..... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं १ चे पती तसेच अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील कै. अंबाजी गंगाराम सुर्वे हे दिनांक ३१/०७/२०१७ रोजी ग्लोबल हॉस्पिटल येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै. गंगाबाई गंगाराम सुर्वे या फार वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत कै. अंबाजी गंगाराम सुर्वे यांचे स्वकष्टार्जित मालकी तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे सानपाडा, ता.ठाणे, जि. ठाणे येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - सानपाडा, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे येथील अपार्टमेंट नं. बी ११/२:११, सेक्टर १०, क्षेत्र २५.३७० चौ.मी. या वर्णनाची निवासी सदनिका.**

सदर वर नमुद केलेल्या मिळकतीतील कै. अंबाजी गंगाराम सुर्वे यांचे हिस्स्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ०१ /१०/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सह अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**कनिठ स्तर, बेलापुर**

# झाडे वाचवण्यासाठी चिपको आंदोलन



**नवी मुंबई : बातमीदार**

सुंदर लाल बहुगुणा यांच्या चिपको चळवळीपासून प्रेरणा घेऊन, पर्यावरणप्रेमींनी वाशी येथील कापलेल्या झाडाला मिठी मारत चिपको आंदोलन करत दुकानांच्या जाहिरातींसाठी केली जाणाऱ्या कत्तलीचा निषेध नोंदवला.

पक्ष्यांना आश्रय देणारे आणि त्यांचे निवासस्थान असलेले पूर्ण वाढलेले बदामाचे झाड २०२३ मध्ये पहिल्यांदाच आणि त्यानंतर वारंवार ते झाड तोडण्यात आले आहे. कोणत्याही फांद्या नसलेले उघडे खोड दयनीय दिसत आहे, असे पर्यावरण निरीक्षक नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.

वृक्षप्रेमींनी झाडांवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी आणि अधिकाऱ्यांना संदेश देण्यासाठी झाडांच्या खोडाला मिठी मारत झाडे वाचविण्याचा संदेश दिला. कार्यकर्त्यांनी शांतपणे बॅनर धरले होते ज्यावर 'झाडे वाचवा, जैवविविधता वाचवा' असे घोषणा लिहिलेले होते नवी मुंबई महापालिकेकडे (एनएमएमसी) तक्रार करणारे कार्यकर्ते मधु शंकर म्हणाले की, सार्वजनिक ठिकाणी, गणेश टॉवरसारख्या मुख्य रस्त्यावर होणाऱ्या झाडांच्या कत्तलीवर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे.

पर्यावरणाला हानी पोहचवणाऱ्या कृत्यांसाठी मी महानगरपालिका आयुक्तांना त्यांच्या पथकांना जबाबदार धरतो, असे कार्यकर्ते अनरजित चौहान म्हणाले.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना टीटीचे इंजेक्शन

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा कार्यालयामध्ये बुधवार दि.१ रोजी प्रायमा असोसिएशन मोहोपाडा कडून सर्व ग्रामपंचायत कर्मचारी तसेच सफाई कर्मचाऱ्यांना टीटीचे इंजेक्शन देण्यात आले, व मुख्यमंत्री ग्रामसमृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले.

या वेळी सरपंच उमा संदीप मुंढे, डॉ. युवराज म्हशीळकर, डॉ. रामप्रसाद कांदोळकर, डॉ. कुणाल कांबळे (प्रायमा सेक्रेटरी) डॉ. अमित चव्हाण (प्रायमा प्रेसिडेंट) डॉ. प्रतीक लोहार (प्रायमा स्पोर्ट सेक्रेटरी) डॉ. गजानन पाटील (प्रायमा व्हाईस प्रेसिडेंट), डॉ. विलास कुलकर्णी



व ह.भ.प वामन भोईर महाराज व सर्व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. सर्व कर्मचाऱ्यांनी टीटनेस इंजेक्शन घेण्याचा लाभ घेतला.

# माहिती अधिकार दिनानिमित्त पनवेल मनपा मुख्यालयात चर्चासत्र



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका मुख्यालयात सोमवारी (दि.२९) आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त 'माहिती अधिकार अधिनियम २००५' या विषयावर आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

पनवेल महानगरपालिकेच्या बैठक कक्षामध्ये परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी राजू पाटोदकर यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या या चर्चासत्रामध्ये तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी नितीन साके यांनी उपस्थितांना 'माहिती अधिकार अधिनियम २००५' मधील विविध तरतुदींविषयी तसेच याबाबतच्या वेगवेगळ्या शासननिर्णयांविषयी माहिती दिली. त्यानंतर माहिती अधिकार कायद्यावरील कार्यालयीन कामकाजाबाबत, अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींबाबत उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये सविस्तर चर्चा झाली.

# तुराडे ग्रामपंचायतीची 'बालस्नेही'कडे वाटचाल

**रसायनी : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पनवेल पंचायत समिती हद्दीतील तुराडे ग्रामपंचायत येथील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक आणि बाल गाव संरक्षण समिती सदस्यांना २६ सप्टेंबर रोजी सेंटर फॉर सोशल ॲक्शन मुंबई यांचेतर्फे बालस्नेही ग्रामपंचायत कशा प्रकारे करायची या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले.

सेंटर फॉर सोशल ॲकशन मुंबई यांचे बाल सभा मंच प्रकल्पाचे महाराष्ट्र समन्वयक दयानंद पाटील यांनी उपस्थित सदस्यांना बालस्नेही संकल्पना, बालस्नेही ग्रामपंचायत महत्व, बाल सभा आणि बाल पंचायत



सक्षमीकरण,बाल सभा आणि बाल पंचायत भुमिका व जबाबदारी, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते भुमिका,बालस्नेही ग्रामपंचायत सरपंच आणि ग्रामसेवक भुमिका या विषयावर प्रशिक्षण दिले.

प्रशिक्षण स्थानिक संस्था प्रेरणा संस्था रिस आणि तुराडे ग्रामपंचायत यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणात सेंटर फॉर सोशल ॲकशन मुंबई यांचे रायगड समन्वयक रूचिका सेलियन, धारावी मुंबई विभाग फिल्ड सुपरवाईजर रसिका डोंगरकर, रायगड विभागीय फिल्ड सुपरवाईजर मनिष भालेराव, आशा किरण पाणेड सेंटर चे संचालक सिस्टर रेखा रोस, प्राची खेडेकर, स्वाती खरमिसे, नंदा धनवडे तसेच प्रेरणा संस्था चे सिस्टर जेनी, संगिता ठाकूर, प्रतिक्षा चव्हाण, मनिषा देशमुख, शिल्पा देशमुख, अस्मिता कचरे आणि जिवन विकास केंद्र कोळखे चे ऊषा कातकरी, स्वाती म्हात्रे, सारिका गायकर, ज्योत्स्ना पाटील हे उपस्थित होते.

तुराडे ग्रामपंचायत सरपंच रंजना गायकवाड, उपसरपंच मालती वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य रिया माळी, सचिन मते, पुजा भोईर, लिना ठाकुर, ग्रामपंचायत अधिकारी अस्मिता मोकल, अंगणवाडी सेविका आरती पाठारे, वासंती सावंत, विभागातील सामाजिक कार्यकर्ते निलम ठाकूर, दिपिका ठाकूर, चंद्रकांत निलंगेबचत गट अध्यक्ष प्रतिमा माळी, पत्रकार विश्वनाथ गायकवाड आणि आनंद पवार, आशा सेविका नजमा साखरकर, तुराडे शाळा मुख्याध्यापक विद्या पाटील आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांनी सर्वांनी प्रशिक्षणात सहभागी होऊन तुराडे ग्रामपंचायत बालस्नेही ग्रामपंचायत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

बालस्नेही ग्रामपंचायत करण्यासाठी मुलांना आनंददायी शिक्षण, बालविवाह, कुपोषण आणि बाल मजुरी मुक्त ग्रामपंचायत, शाळा बाह्य मुलांना शाळेत दाखल करण्यात येणार असल्याचे सर्वांनी प्रशिक्षणात सांगितले.

# एमएनएम विद्यालयात स्वर साधना अंतर्गत आंतरशालेय गीत गायन स्पर्धा रंगली




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय (एमएनएम) व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स मध्ये संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी पदार्पण वर्षाबद्दल स्वर साधना संकल्पनेअंतर्गत एकल, समूहगीत तसेच गीता, व मनाचे श्लोक पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये संस्थेच्या संलग्न शाळा पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सदरहू कार्यक्रमाची सुरुवात जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रकाश भगत तसेच गव्हाणे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांनी दीपप्रज्वलनाने केली. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांनी आंतर शालेय एकल आणि समूह गान स्पर्धा या विद्यार्थ्यांच्या अंगीभुत गुणांना वाव देत असून, संगीत हे मनाला ऊर्जा देणारे असून संगीत साधना ही खूप महत्त्वाची आहे, असे सांगितले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक केले. उपस्थित स्पर्धकांच्या गायनकौशल्याचे कौतुक केले. एकल व समूह गीत स्पर्धेचे परीक्षण, असावरी गोंधळी व कीर्ती गोंधळी यांनी केले. तसेच गीता पठण स्पर्धेचे परीक्षण पल्लवी सुर्वे यांनी केले.

शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन माने, नर्सिला कांबळे व शर्मिन काझी यांनी केले. संगीत शिक्षक श्री भास्कर म्हात्रे यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.



## दुर्गामाता दौड



**पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत बुधवारी दोन ठिकाणी दुर्गामाता दौड काढण्यात आली. पहिली दौड ही ह्यावर्षी कुडावे गावात काढण्यात आली. गावच्या वेशीवर एकत्र जमून ही दौड सुरू करण्यात आली, नंतर गाव देवीच्या मंदिरात जाऊन देवीची आरती करण्यात आली नंतर संपूर्ण गावभर मार्गक्रमण करून जिल्हा परिषद शाळेच्या येथील शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या ठिकाणी येवून दौडीची सांगता करण्यात आली दुसरी दौड करंजाडे गाव आणि सेक्टर भागात काढण्यात आली. दरम्यान, दौडमध्ये सहभागी होण्यासाठी शुभम साळुंखे (९७०२७ ०६२६२) यांना संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# 'आरएसएस'तर्फे आज शस्त्रपूजन

**पनवेल :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पनवेल नगरतर्फे 'श्री विजयादशमी उत्सव'शस्त्रपूजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे.

संघ कार्याचा शुभारंभदेखील विजयादशमीच्या दिवशी झाला असल्याने या दिवसाचे महत्त्व अधिक वाढते. शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर असलेल्या संघाच्या या अखंड यात्रेची परंपरा आजही तेजोमय सुरू आहे. यावर्षीचा उत्सव गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५ रोजी संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत विरुपाक्ष हॉल, पनवेल येथे होणार आहे. या उत्सवाचे मुख्य अतिथी डॉ. समिधा गांधी असतील, तर प्रमुख वक्ते म्हणून सुनील सप्रे (कोकण प्रांत कार्यकारिणी सदस्य) उपस्थित राहणार आहेत. सर्वांनी वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन पनवेल नगर संघचालक राकेश वसंत फाटक यांनी केले आहे.

# बौद्धिक संपदा हक्काबाबत मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी राइट्स (IPR) अर्थात बौद्धिक संपदा हक्क या विषयावरील मार्गदर्शन सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि बौद्धिक संपदा हक्क विभागाच्या संयुक्त उपक्रमातून हे मार्गदर्शन सत्र घेण्यात आले.

बेंगळुरूच्या जी. इ. एच. रिसर्च या संस्थेचे संस्थापक डॉ. बी. के. सरकार आणि महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबईचे इन चार्ज लायब्रेरियन डॉ. बी. के. मोरे यांच्या सारख्या मान्यवरांचे मार्गदर्शन यानिमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना लाभले.

प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. महाविद्यालयातील बौद्धिक संपदा हक्क विभागाच्या सदस्य सचिव डॉ. ज्योत्स्ना ठाकूर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. या मार्गदर्शन सत्रात डॉ. सरकार यांनी विद्यार्थ्यांना आयपीआर फाईलिंग, पेटंटचे व्यवसायीकरण आणि संबंधित योजना याबाबत प्रेरणादायी शब्दात मार्गदर्शन केले, तर डॉ. बी.के. मोरे यांनी तांत्रिक बाबी स्पष्ट केल्या.

या वेळी महाविद्यालयातील एकूण ४१ पेटंटधारकांना सन्मानित करून त्यांच्या नवप्रवर्तनाचे कौतुक करण्यात आले. ज्यामध्ये बारा मान्यताप्राप्त पेटंट, सहा आंतरराष्ट्रीय, तर सहा राष्ट्रीय पातळीवरील पेटंटचा समावेश आहे. यापैकी २२ पेटंट प्रसिद्ध झालेले असून तीन पेटेंटची नोंदणी झालेली आहे. तर चार विषयांचे कॉपीराइट्स अर्थात स्वामित्व हक्क महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी मिळवले आहेत. सूत्रसंचालन विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक नेहा फोपले यांनी केले, तर आभार प्रदर्शन सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्राध्यापक जी. एस. साठे यांनी केले. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे अध्यक्ष डॉ. बी.डी. आघाव, कला विभागाचे प्रमुख डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. एस. बी. यादव इत्यादी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात रंगला दांडियारास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी)उच्च माध्यमिक विद्यालयात सांस्कृतिक समितीच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त दांडिया रास चे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक अजित



सोनवणे, कैलास म्हात्रे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते. सायन्स विभागातर्फे सहाय्यक शिक्षक रामहरी मस्के व सविता सावंत तर कला व वाणिज्य विभागातर्फे माधवी कोळी व साईनाथ पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. दांडियारास मध्ये मुलींमधून ईश्वरी उमेश गायकवाड व शुभदा दीपक सोनवणे या दोघींची 'दांडिया क्वीन' तर मुलांमधून अथर्व अमरीश मोकल व आर्यन संतोष जाधव या विद्यार्थ्यांची 'दांडिया किंग ' म्हणून निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. अतिशय उत्साहपूर्ण, आनंदाच्या वातावरणात सर्व विद्यार्थ्यांनी या दांडियारास कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.



**पनवेल : भाजप प्रभाग १५चे अध्यक्ष शांताराम महाडिक यांचा ८३वा वाढदिवस नवीन पनवेल भाजप मंडळ कार्यालयात करण्यात आला. या वेळी मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, सरचिटणीस भीमराव पोवार, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, कामगार नेते मोतीराम कोळी, उपाध्यक्ष गोपीनाथ मुंडे, संजय कांबळे, सचिन गायकवाड, दीपक जांभळी, अनिता रास्कर, स्वाती नांगरे, वंदना म्हात्रे, यादवताई, आशा मुंडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये महात्मा गांधी जयंती सप्ताहानिमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्कूलमधील पूर्व प्राथमिक विभागाच्या सर्व विद्यार्थी व शिक्षकांकडून शाळा स्वच्छ करण्यात आली.

पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्या व शिक्षकांकडून शाळा परिसर व मैदान स्वच्छ करण्यात आले. सहावी ते नववीच्या सर्व शिक्षक, स्कूल शिक्षकेतर कर्मचारी व मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांच्याकडून सेक्टर २४मधील हनुमान मंदिर परिसर, सेक्टर २४ मधील रस्ते शाळाबाहेरील सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच स्वच्छ परिसर सुंदर परिसर या उक्तीला प्रेरित सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससीतर्फे स्वच्छता मोहीम रयत शिक्षण संस्थेच्या सौ शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे महात्मा गांधी जयंती सत्ता निमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली स्कूलमधील पूर्व प्राथमिक विभागाच्या सर्व विद्यार्थी व शिक्षकांकडून शाळा स्वच्छ करण्यात आली इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्या व शिक्षकांकडून शाळा परिसर व मैदान स्वच्छ करण्यात आले. तर इयत्ता सहावी ते नववीच्या सर्व शिक्षक व स्कूल शिक्षकेतर कर्मचारी व स्कूल मुख्याध्यापिका समुक्त खटावकर यांच्याकडून सेक्टर २४ मधील हनुमान मंदिर परिसर सेक्टर २४ रस्ता शाळाबाहेरील सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तसेच स्वच्छ परिसर सुंदर परिसर या उक्तीला प्रेरित होऊन आपले शहर स्वच्छ ठेवण्यासाठी शपथ घेण्यात आली.

# गुरे चोरणारी टोळी जेरबंद

## दोन आरोपींना अटक

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस स्टेशन हद्दीतील वेलशेत येथील मोकळ्या मैदानातून गुरुवारी (दि.१८) सकाळी ५ वाजेच्या सुमारास दोन गुरे इनोव्हा कार मधील अज्ञात चोरट्यांनी चोरीच्या हेतूने पळवून नेले होते. परंतु नागोठणे पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी यांनी पोलीस खात्यातील अनुभव पणास लावून अत्यंत हुशारीने गुरे चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना जेरबंद केले आहे. दरम्यान, या गुन्ह्याचा वेगवान उत्कृष्ट व कौशल्यपूर्ण तपास केल्याने सर्वत्र नागोठणे पोलीस अधिकारी सचिन कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांचे नागोठणेकर नागरिकांकडून कौतुक होत आहे.



याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं.१०४/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२),३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या अनुषंगाने रायगड पोलीस अधिक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवथरे, पोलीस उपअधिक्षक रोहा प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, सहाय्यक फौजदार संदेश सानप, म.पो.ह संजिता सानप, पो. शि. प्रकाश हंबीर यांनी रसायनी पोलीस स्टेशनच्या मदतीने तांत्रिक व वैज्ञानिक पद्धतीने तपास करून या गुन्ह्यातील आरोपी पापा इसा कच्ची, (वय २९) पनवेल जिल्हा रायगड व आलम अनिस शेख (वय २६) मूळ राहणार कल्याण सध्या राहणार पनवेल जिल्हा रायगड यांना रसायनी पोलीस स्टेशन कडून ताबा घेऊन सोमवार, २२ सप्टेंबर रोजी नागोठणे पोलिसांनी अटक केली आहे.

न्यायालयाकडून या दोन्ही आरोपींना शुक्रवारपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. याबाबत सखोल चौकशी करून गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत कारण्याबाबत सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# रोहा-नागोठणे रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा नागोठणे मार्गावर ठीक ठिकाणी रस्त्याची चाळण झाल्याची दिसून येत आहे. त्यामुळे नागरिक पुरत्या हैराण झाले आहेत. रोजचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्याचा त्रास होत आहे. रस्त्याची अक्षरशः चाळण झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे नागरिकांतून रस्ता डागडुजीची मागणी होत आहे.

रोहाहून अलिबाग, नागोठणे, मुंबई, पुणे या ठिकाणी जाणाऱ्या मार्गावर प्रवाशांना प्रचंड मनस्ताप होताना दिसत आहे. या मार्गावर रेल्वे जात असताना सातत्याने गेट पडत असल्यामुळे प्रवाशांना आपल्या इच्छित ठिकाणी जाण्यासाठी सातत्याने उशीर होत आहे. दुसरीकडे या मार्गावरील रस्त्याची ही दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे



पडल्यामुळे या खड्ड्यातून गाडी चालवण्याची कसरत वाहनधारकांना करावी लागत आहे. हा मुख्य मार्ग असताना या रस्त्याची दुरुस्ती व्हावी, अशी मागणी प्रवाशांकडुन होत आहे.

रोहा नागोठणे मार्गावरील अष्टमी पुल ते गुजरनाला पर्यंत अक्षरशः रस्त्याची चाळण झाली आहे. अष्टमी पूल ते रेल्वे स्टेशन व नव्याने काम चालू असलेल्या उड्डाणपूल च्या खालील रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. याच मार्गावर खारापटी येथेही रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या संबंधित रस्त्याबाबत नागरिक सातत्याने विविध माध्यमातून आवाज उठवत असतात. रस्ता दुरुस्तीची मागणी करत असतात. या रस्त्याबाबत नागरिकाकडून संताप व्यक्त होत असताना तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

### सातत्याने अपघात

दुचाकी वाहन, रिक्षा, चार चाकी वाहन यांना सातत्याने रस्त्यावरील खड्ड्याचा फटका बसत असल्याने गाड्या नादुरुस्त होताना दिसत आहे. दुचाकी वाहनधारकांचे सातत्याने अपघात होताना दिसत आहेत.

# दुकानाला आग

**पेण :** शहरातील बालाजी कॉम्प्लेक्सच्या बाहेर असणाऱ्या पंक्चर काढणाऱ्या टायरच्या दुकानाला रात्रीच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला होता. काही क्षणांतच धुराचे प्रचंड लोट मुख्य रस्त्यासह आजूबाजूच्या सोसायटीमध्ये गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेची माहिती मिळताच पेण नगरपालिकेचे अग्निशमन दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. तसेच कोणतीही घटना घडू नये यासाठी पेण पोलीस दलाने घटनास्थळी उपस्थित राहून सदरचा परिसर सुरक्षित केला. आगीचे नेमके कारण समजू शकले नसले तरी प्राथमिक अंदाजात शॉर्ट सर्किट मुळे आग लागल्याचे समजते. आगीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाजातून समोर आले आहे, सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

# कलोते येथे आदी कर्मयोगी कार्यक्रमाबाबत तयारी

**चौक : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकारने धरती आबा जन जातीय ग्रामउत्कर्ष अभियानांतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. या संदर्भात खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कलोते येथे विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांनी आदिवासीवाडीत जाऊन माहिती दिली.

खालापूर तालुक्यातील १० गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. यापैकी ग्रुप ग्रामपंचायत कलोते अंतर्गत विनेगाव, दांडवाडी, बापदेववाडी, कातळाचीवाडी, कांढरोली तर्फे वनखळ या ठिकाणी महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप, विस्तार अधिकारी विनोद



चांदोरकर, महिला व बालकल्याण संघमित्रा अंधोरीकर, कनिष्ठ अभियंता पूनम म्हात्रे, विस्तार अधिकारी अमित म्हसकर, ग्रामपंचायत अधिकारी निलेश म्हसकर, कृषी अधिकारी नितीन महाडिक, प्रकल्प अधिकारी विशाल घोरपडे, ग्राम महसूल अधिकारी माधव कावरखे, कृषी सहायक सारंग यांच्यासह वन विभाग कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षक, ग्राम पंचायत सदस्य, पोलीस पाटील यांनी भेट देऊन कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रमाला सुरुवात केली. या वेळी आदिवासी बांधव, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

वरिष्ठ विस्तार अधिकारी विनोद चांदोरकर यांनी आदि कर्मयोगी अभियानांतर्गत गावाचा विकास आराखडा तयार करण्याबाबत माहिती दिली. प्राधान्यक्रमाने कोणती कामे करावी त्यानुसार आराखडा तयार करून २ ऑक्टोबर रोजी आपल्या ग्रामसभेत मान्यता घेऊन ती सर्व करावयाच्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा राबविण्यात येत असून यामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत आदिवासी बांधवांचे जन्म दाखले यासाठी विशेष मोहीम राबवून जन्म दाखले व आधार नोंदणी करण्याबाबत आरोग्य विस्तार अधिकारी अमित म्हसकर व ग्राम पंचायत अधिकारी निलेश म्हसकर यांनी माहिती दिली.

महसूल विभागाचे राजस्व अभियान व ग्रामविकास विभागाचे मुख्यमंत्री पंचायतराज अभियान यांचा उद्देश तळागाळातील आदिवासी बांधवांना सशक्त करणे व गावांचा सर्वांगीण विकास साधणे; त्याचप्रमाणे शासनाच्या सर्व योजनांचा लाभ आदिवासी यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी महिला व बालविकास अधिकारी संघमित्रा अंधोरीकर यांनी माहिती दिली. सर्व विभागणी आराखडा तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत, अशी माहिती महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप यांनी दिली.

# भाजप जिल्हाध्यक्षांचे खोपोलीत देवी दर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

भाजपचे उत्तर रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश कोळी यांनी खोपोली शहरातील सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांना भेटी देऊन श्रीदेवीचे दर्शन घेतले त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चाही केली. आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जाते.

मंगळवारी अविनाश कोळी यांचे खोपोली शहरात शांतीनगर येथे आगमन झाल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले. शांतीनगर नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने युवा नेते विक्रम साबळे यांनी



त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या वेळी भारतीय जनता पक्षाच्या महिला शहर अध्यक्ष अश्विनीताई अत्रे, कर्जत खालापूर विधानसभा समन्वयक हेमंत नांदे, शहर सरचिटणीस अजय इंगुलकर, वैद्यकीय सेलचे डॉ. बबन नागरगोजे, कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख, माझी शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर , युवा मोर्चा शहराध्यक्ष डॉ. अनिकेत पाटील, माजी नगरसेविका अपर्णा मोरे, सचिन मोरे, सुनील नांदे, राजू पडघमकर, गोकुळ पेंडभाजे, दिलीप ढेरे, विवेक पेंडभाजे, यश ढेरे, प्रमोद कांबळे, अतुल पवार आदी उपस्थित होते.

# रेवदंडा अर्बन बँकेची सर्वसाधारण सभा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

दि. रेवदंडा को-ऑप. अर्बन बँक लि.ची ९६वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या सभेत मोठ्या संख्येने बँकेचे सभासद उपस्थित होते.

रेवदंडा अर्बन बँकेच्या सभागृहात विद्यमान चेअरमन नजमुस्साकिब म.अ. लांबाते यांचे अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. सभेस व्हाईस चेअरमन धरती राउत, संचालक वामन घरत, प्रभाकर नाईक, जाकिरअली हसवारे, सतिश लेले, आरती मढवी, गजानन झेंडेकर, अंजनकुमार तांबडकर, अरुण म्हात्रे, महेंद्र पाटील, मंगेश परभाळे, निलेश गाडे, तज्ञ संचालक शादाअ महमंद रफिक काटे आदी उपस्थित होते.

प्रारंभी दिवंगताना श्रध्दाजंली अर्पण करून बँकेच्या सभेस सुरुवात करण्यात आली. चेअरमन नजमुस्साकिब लांबाते यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले. त्यानंतर प्रास्ताविकात सभासदांना विविध विषयावर आवाहन करून बँकेची सध्य प्रगतीबाबत सविस्तर माहिती दिली. या सभेत सभासद हेमंत दांडेकर, हेमंत गणपत, जनार्दन कोंडे, गोरखनाथ नवरीकर, सुराराम माळी, भगवान तांबडकर, ओमकार तांबडकर आदींनी विविध चर्चेत सहभाग घेतला. बँकेचे संचालक निलेश गाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाची सभा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ या संस्थेची ४६वी सर्वसाधारण सभा नुकतीच सहयोग मंदिर सभागृह येथे पार पाडली. १ मे २०२५ ते १ मे २०२६ हे संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याने वर्षभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्थेचे चिटणीस अविकांत साळुंके यांनी ४५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले आणि सरचिटणीस राजू पातेरे यांनी प्रास्ताविक भाषणात संस्थेच्या प्रमुख कार्याचा तपशील ओघवत्या शैलीत मांडला तसेच १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचे खजिनदार विजय पवार यांनी वाचन करून तो मंजूर करण्यात आला. आर्थिक अहवाल अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांनी सादर केला.

अंतर्गत हिशोब तपासनीस दत्ता सागळे यांनी गतवर्षीचा कार्यअहवाल सादर केला. या सभेत अंदाजपत्रक तयार करून सादर करण्यात आले त्यास उपस्थितांनी मंजुरी दिली. रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून अंदाजपत्रात ५० टक्के वाढ करण्यात आली आहे. संस्थेचे नवीन सभागृह खरेदी करण्याचा मानस असल्याने सभागृह निधी संकलन मोहिमेबाबत चर्चा करण्यात आली. सभागृह निधी देणगीदारांचा सत्कार केला व उपस्थितांचे आभार मानून सभेची सांगता करण्यात आली. संस्थेचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.



# एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव



**माणगाव : प्रतिनिधी**

धर्मवीर संभाजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था निजामपूर माणगाव येथे एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव झाला. पंडित दीनदयाळ यांच्या जयंतीनिमित्त हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाचे प्राचार्य धीरज ठाकूर, प्रमुख वक्ते अजित शेडगे आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

प्रमुख वक्ते अजित शेडगे यांनी एकात्म मानव दर्शन या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी एकात्म भाव असलेला मनुष्य धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ साध्य करतो. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या पातळ्यांवर समन्वय साधला, तरच राष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल आदी विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य धीरज ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.जी. आर.दहोत्रे यांनी केले, तर आभार कांबळे यांनी मानले.

# कामगार बेपत्ता

**खालापूर : प्रतिनिधी**

सावरोली टोलनाक्याजवळ मिसिंक लिंकचे काम सुरू असताना यामध्ये मेस्त्रीचे काम करणारा सिकंदर जगरनाथ महोतो (वय २१, रा. केदरीया, मुजफरपूर, बिहार, सध्या खालापूर) हा मागील सहा महिन्यांपासून घरी परत न आल्याने खालापूर पोलिसांत मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तरुणाने अंगात सफेद शर्ट, निळी जिन्स काळे बुट घातले आहेत. तरुणारा रंग सावळा, केस काळे, अंगाने मध्यम, उंची १६० सेंटीमीटर अशा वर्णनाचा इसम आढळ्यास खालापूर पोलिसांना ०२१९२२७५०३३ किंवा ९२७३३९३९९१ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# स्वैच्छिक रक्तदान... सेवा पंधरवडा...

स्वस्थ नारी निरोगी परिवार या अभिमान अंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर हा सेवा पंधरवडा म्हणून आरोग्याच्या दृष्टीने केंद्र सरकार तसेच राज्य सरकार, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्वत्र राबविण्यात येत आहे. सेवा पंधरवडा हा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाच्या औचित्य साधून राबविण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या सेवाभाव तत्त्वज्ञानाचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाभिमुख विचारांचा हा संगम साधणारा उपक्रम असून महाराष्ट्र शासन-प्रशासनाला लोकाभिमुख, कार्यक्षम आणि अधिक पारदर्शक करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वस्थ नारी निरोगी परिवार हे विशेष अभियान सर्वत्र देशात तसेच महाराष्ट्रातील जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी शिक्षित करणे आणि त्यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे आहे. महिला व बालकांसाठी हे विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करून प्रत्येक आयुष्मान आरोग्य अभियानात आणि अंगणवाडीमध्ये आरोग्य तपासणी, मार्गदर्शन शिबिरे भरवण्यात येत आहेत. या सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने सर्वत्र स्वैच्छिक रक्तदान शिबिर अभियान राबविण्यात येत आहे.

### स्वैच्छिक रक्तदान आणि एड्स प्रतिबंध व नियंत्रण जनजागृती

केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई तसेच संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्या स्वैच्छिक रक्तदान अभियानाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्ह्यात जिल्हाधिकारी तसेच जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अधिपत्याखाली जिल्हा रुग्णालय-अलिबाग अंतर्गत एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग यांच्या विद्यमाने इंटिसिफाईड आयईसी कॅम्पेन अभियाना अंतर्गत एचआयव्ही/एड्स या आजाराविषयी जनजागृती आणि रक्तकेंद्रामार्फत राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान अभियान जनजागृतीचे महान कार्य राबविण्यात येत आहे. १ ऑक्टोबर राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस दरवर्षी स्वैच्छिक रक्तदान अभियान म्हणून साजरा केला जातो. याचा मुख्य उद्देश समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या वाढवणे आणि सुरक्षित रक्तपुरवठ्यासाठी स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व पटवून देणे हा आहे. लोकांना स्वैच्छिक रक्तदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी

सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने जनतेच्या सेवेसाठी, राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी राबविण्यात येत आहे. या वर्षीच्या शासनाचे घोषवाक्ये आहे.... रक्त देऊ या, आशा जागवू या, एकत्रितपणे जीव वाचवू या...

समाजात स्वैच्छिक रक्तदान करणाऱ्यांची संख्या वाढवणे आणि रुग्णांसाठी सुरक्षित रक्त पुरवठ्यासाठी जनजागृती करणे.

१ ऑक्टोबर १९७५ रोजी हा दिवस सर्व प्रथम साजरा करण्यात आला होता. तरुण पिढीमध्ये रक्तदान करण्याबद्दल जागरूकता निर्माण व्हावी हा यामागचा मुख्य उद्देश. राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान अभियान आरोग्य सेतू पोर्टलवर https://eraktkosh.mohfw.gov.in/ या वेबसाईटवर रजिस्टर नोंदणी करून स्वैच्छिक रक्तदान करुन रक्तदानाबद्दल ऑनलाईन रक्तदान प्रमाणपत्र देता येते.

### स्वैच्छिक रक्तदान का महत्त्वाचे?

थॅलेसेमिया, हिमोफिलिया, प्रसूती, अपघात, रक्तक्षय, इ.रुग्णांसाठी रक्त हे लाईफ लाईन आहे, अशा रुग्णांना नेहमी रक्ताची गरज असते. अशा रुग्णांचा जीव वाचविण्यासाठी माझे रक्तदान अमूल्य आहे. बोन मॅरोमध्ये नवीन रक्त तयार करण्याची कार्यक्षमता वाढते. रक्तदान प्रक्रियेत रक्तदानाची सुरक्षितता काटेकोरपणे पाळली जाते. त्यामुळे कोणत्याही इजा किंवा आजार होण्याची शक्यता नसते. मानवी रक्ताला पर्याय नाही कारण रक्त हे कृत्रिमरित्या प्रयोगशाळेत तसेच कारखान्यात तयार करता येत नाही तसेच जास्त दिवस साठवूनही ठेवता येत नाही. त्यामुळे माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाचेच रक्त द्यावे लागते. दान केलेले रक्त शरीरात नैसर्गिकरित्या भरून निघते. माझ्या स्वैच्छिक रक्तदानाने एखाद्या रुग्णांचे प्राण वाचवू शकतो. माझे रक्तदान सुरक्षित,आनंददायी तसेच वेदनारहित असते. नियमित रक्तदानाने शरीरातील कोलेस्टेरॉल व रक्तदाब नियंत्रित तसेच कॅन्सर सारख्या आजाराचा धोका कमी राहतो. रक्तदान करतेवेळी मार्गदर्शक सूचनेनुसार संपूर्ण तपासणी करून रक्त घेतले जाते. मार्गदर्शक सुचनेनुसार स्वैच्छिक रक्तदान करून कार्डावर दोन वर्षात एक वेळेस मोफत रक्तपुरवठा केला जातो. रक्तदान हे जीवनदान आहे म्हणून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून नि:स्वार्थपणे, समाजहितासाठी, राष्ट्रसेवेच्या भावनेतून... आपले रक्तदान महत्त्वाचे. दर तीन महिन्यांनी आपण रक्तदान करु शकता.

रक्त हे शरीराचा अविभाज्य घटक असून संपूर्ण मासपेशींना तसेच अवयवांना पोषण व प्राणवायू (ऑक्सीजन) देण्याचे काम रक्त करत असते. गरजू रुग्णांसाठी रक्तदान केल्याने त्यांचे प्राण आपण वाचवू शकतो, असा संदेश स्वैच्छिक रक्तदाता म्हणून समाजासाठी देऊ शकतो.

स्वैच्छिक रक्तदान अमृत महोत्सव अभियान राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेतू पोर्टलवर स्वैच्छिक रक्तदानासाठी रजिस्टर करून स्वैच्छिक रक्तदात्यांनी सहभागी होऊन गरजू रुग्णांचे प्राण वाचविल्याचे समाधान समाजासाठी व्यक्त करु शकता. यामध्ये अनेक रक्तदाते मानवतेसाठी पंतप्रधानांचा मिशनचा हिस्सा बनण्यासाठी सहभागी झाले आहे.

या रक्तदान मोहिमेत आपणही सहभागी होऊन आपण रुग्णांचे प्राण वाचविण्याचे पवित्र काम करु शकता. अनेक सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था आणि सामान्य माणसांनीही रक्तदानासाठी मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन रक्तकेंद्रात आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध होईल. रक्तदान हे महान कार्य आहे तसेच मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाविषयी प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज उभी करून रक्तदात्यांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे,

माणुसकीच्या दृष्टीने सामाजिक बांधिलकी ठेवून देशाचा नागरिक म्हणून रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी स्वैच्छिक रक्तदान या राष्ट्रीय मोहिमेत सहभागी व्हावे एवढीच अपेक्षा. समाजात रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी यामागे एवढाच उद्देश.

**-हेमकांत सोनार, रक्तपेढी तंत्रज्ञ, जिल्हा रुग्णालय, रक्त केंद्र, अलिबाग**

# भारतीय महिलांची वर्ल्डकपमध्ये विजयी सलामी

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने श्रीलंकेचा पराभव करत महिला एकदिवसीय विश्वचषकाला विजयाने सुरुवात केली आहे. यजमान भारतीय संघाने श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात सांघिक कामगिरीच्या जोरावर विजय साकारला.

भारताने श्रीलंकेला २११ धावांवर सर्वबाद करत ५९ धावांनी डीएलएसप्रमाणे विजय मिळवला. भारताच्या डावात तीन वेळा पावसाच्या व्यत्ययामुळे सामना थांबला आणि त्यामुळे सामना हा ४७ षटकांचा करण्यात आला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद २६९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ ९ चेंडू शिल्लक ठेवत २११ धावांवर सर्वबाद झाला.



भारताने दिलेल्या २७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने सावध सुरुवात केली, पण ते भारताच्या गोलंदाजीसमोर फार काळ टिकू शकले नाही. क्रांती गौडने हसीनी परेराला बाद करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला, तर दीप्ती शर्माने चमारी अट्टापट्टूला ४३ धावांवर बाद करत सर्वात मोठी विकेट मिळवली. यानंतर ठराविक अंतराने श्रीलंकेने विकेट्स गमावल्या.

भारताकडून दीप्ती शर्माने तीन विकेट्स घेतल्या. दीप्तीने अर्धशतक आणि नंतर गोलंदाजीत तीन विकेट्स घेत अष्टपैलू कामगिरीसह सामनावीराचा पुरस्कार पटकावला. याशिवाय श्रीचरणी व स्नेह राणाने प्रत्येकी दोन, तर क्रांती गौड, अमनजोत व प्रतिका रावल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## श्रीलंकेवर मात

तत्पूर्वी श्रीलंकेने नाणेफेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केले. भारताची सुरुवात फारशी चांगली नाही, कारण स्मृती मानधना अवघ्या ८ धावा करत बाद झाली. यानंतर प्रतिका रावल व हरलीन देओल यांनी संघाचा डाव सावरला. प्रतिका रावल ३७, तर हरलीन देओलने ४८ धावांची खेळी केली. हरमन झटपट २१ धावा करत बाद झाली. यानंतर दीप्ती शर्मा व अमनजोत कौर यांनी शतकी भागीदारी केली आणि संघाचा डाव सावरला.

श्रीलंकेच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. श्रीलंकेकडून ४० वर्षीय प्रबोधनीने दोन विकेट्स घेतल्या, तर फिरकीपटू रानावीरा हिने एका षटकात तीन विकेट्ससह संपूर्ण सामन्यात चार विकेट्स घेतल्या. याशिवाय कुलासूर्या व चमारी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

अमनजोत कौरला श्रीलंकेकडून तीन वेळा जीवदान मिळाले, ज्याचा तिने चांगला फायदा करून घेतला आणि अर्धशतकी खेळी केली. अमनजोतने ५६ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकारासह ५७ धावांची खेळी केली, तर दीप्ती शर्माने ५३ चेंडूत चार चौकारांसह ५३ धावा केल्या. याशिवाय अखेरच्या दोन षटकांमध्ये फलंदाजीला आलेल्या स्नेह राणाने उत्कृष्ट फटकेबाजी करत १५ चेंडूत दोन चौकार आणि दोन षटकारांसह २८ धावांची खेळी केली. यासह भारताने २६९ धावा केल्या.

# वैभव सूर्यवंशीची बॅट पुन्हा एकदा तळपली

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत विक्रमी शतक

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**




भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचा तुफानी फॉर्म ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरही कायम आहे. वनडेमध्ये धमाकेदार कामगिरी केल्यानंतर आता त्याने यूथ टेस्टमध्येही आपली प्रतिभा सिद्ध केली. ब्रिस्बेन येथील इयान हीली ओव्हलवर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या यूथ टेस्ट मॅचमध्ये त्याने आक्रमक खेळी करत एक शानदार शतक झळकावले. या कामगिरीसह त्याच्या नावावर अनेक विक्रम नोंदवण्यात आले.

ऑस्ट्रेलियाचा दौरा युवा फलंदाजांसाठी नेहमीच कठीण मानला जातो, पण वैभव सूर्यवंशीने हा दौरा अगदी सोपा करून दाखवला. इंडिया अंडर-१९ टीमकडून खेळताना त्याने केवळ ८६ चेंडूंमध्ये ११३ धावांची स्फोटक खेळी केली. हेडन सिलरच्या गोलंदाजीवर तो बाद झाला असला, तरी पॅव्हेलियनमध्ये परतण्यापूर्वी त्याने आठ चौकार आणि चार षटकार मारत 'कांगारू' गोलंदाजाच्या नाकी नऊ आणले.

वैभव सूर्यवंशीच्या या खेळीमुळे एक मोठा विक्रम मोडला गेला. त्याने केलेले ७८ चेंडूंमधील शतक हे युथ टेस्टमध्ये ऑस्ट्रेलियाच्या भूमीवरचे सर्वात जलद शतक ठरले. या शतकामुळे त्याने आणखी एक खास विक्रम आपल्या नावावर केला. १००पेक्षा कमी चेंडूंमध्ये दोन युथ टेस्ट शतक झळकावणारा तो न्यूझीलंडचा महान फलंदाज ब्रेंडन मॅक्युलम याच्यानंतरचा पहिला खेळाडू बनला आहे. यापूर्वी २०२४मध्ये त्याने ऑस्ट्रेलिया अंडर-१९विरुद्ध ५८ चेंडूंमध्ये शतक ठोकले.

युथ टेस्टमध्ये भारतासाठी सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीतही वैभवने आता पहिला क्रमांक मिळवला. त्याने आपल्या शानदार खेळीत आठ षटकार मारून कॅप्टन आयुष म्हात्रेचा जुना विक्रम मोडला. वैभवच्या नावावर आता युथ टेस्टमध्ये एकूण १५ षटकारांची नोंद झाली. वयाच्या १४व्या वर्षी अशी कामगिरी करणारा तो जगातील सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला आहे.

# राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींची दमदार कामगिरी



**नवी मुंबई : बातमीदार**

उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथील सय्यद मोदी रेल्वे स्टेडियममध्ये झालेल्या सीआयएससीई राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींनी उल्लेखनीय यश संपादन केले. विविध वयोगटांमध्ये महाराष्ट्राच्या संघांनी आपली ताकद सिद्ध करून राज्याचा झेंडा उंचावला.

या स्पर्धेत देशातील विविध राज्यांच्या एकूण १५ संघांनी सहभाग घेतला होता. अंडर-१४ गटात महाराष्ट्राच्या संघाकडून शर्वरी नेमाने, अवनी लुंकड, राशी तलरेजा, वृष्टी गुप्ता, अरणा बोराडे, काशवी मुच्छाळ, आकायशा सेठ, गिरिजा आडनाईक, शनाया शहा, अनया गावंड, अर्णा कल्याणी, जेश्वा शेट्टी या मुलींनी उल्लेखनीय कामगिरी केली. उपांत्य फेरीत कर्नाटक या बलाढ्य संघाला पराभूत करत त्यांनी उपविजेतेपद पटकावले, पण अंतिम फेरीत यजमान संघ उत्तर प्रदेशकडून पराभव पत्करावा लागला. अंडर-१७ गटाच्या अंतिम सामन्यात उत्तर प्रदेशवर मात करत ऐतिहासिक विजय मिळविला व अंडर-१९ गटात उपविजेतेपद पटकावले.

या यशात खेळाडूंच्या जिद्दीबरोबरच प्रशिक्षक व व्यवस्थापन समितीच्या अथक परिश्रमांचीही मोलाची भूमिका असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे संघाने उत्कृष्ट कामगिरी साधली आहे. ही कामगिरी राज्यातील खेळाडू, प्रशिक्षक, पालक आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

# विंडीजविरुद्ध मालिकेसाठी भारताचा सराव

**अहमदाबाद :** आशिया चषक स्पर्धेतील दिमाखदार विजयानंतर भारतीय संघाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी मैदानात उतरत तयारी सुरू केली. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह, फिरकीपटू कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांना विश्रांती देण्यात आली आहे.

इंग्लंडमध्ये कडवी झुंज देऊन २-२ अशी मालिका बरोबरीत राखणाऱ्या शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय कसोटी संघासाठी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील हे पहिलेच घरचे आव्हान असेल. कर्णधार गिल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासह संघातील सदस्य येथे पोहचले आणि त्यांनी नरेंद्र मोदी स्टेडियमवर सराव केला.

# मुरूडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे पावसाळी क्रीडा स्पर्धेत यश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा नुकतीच विहूर येथील मेहबूब एज्युकेशन हायस्कूलच्या पटांगणावर झाली. या वेळी अंजुमन इस्लाम जंजिरा ॲग्री हायस्कूलमधील शालेय विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये घवघवीत यश संपादन केले.



१९ वर्षाखालील धावण्याच्या शर्यतीत गटात बाझिल नाखुदा १५०० मी. आणि ४०० मी.मध्ये प्रथम क्रमांक, इब्राहिम नाखुदा १०० मी.मध्ये द्वितीय, आफताब दखनी २०० मी.मध्ये द्वितीय, शुजात अरब २०० मीटरमध्ये प्रथम व लांब उडीमध्ये तृतीय, शाफान परकार गोळाफेकमध्ये तृतीय, रय्यान उलडे कॅरम स्पर्धेत द्वितीय, सफा कारबारी भालाफेक प्रथम, तर मिस्बाह सावरी थाळीफेकमध्ये द्वितीय, १०० मी. रानिंगमध्ये तृतीय व उंचउडीत तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षाखालील मुलांच्या गटात भालाफेकमध्ये अब्दुल्लाह कोतविलकरने प्रथम क्रमांक, कराटेत नफिस चौधरीने प्रथम, हास्सान कासकरने तृतीय, हुझैफा आरिफ १५०० मीटर धावण्याच्या शर्यतीत दुसरा आणि खिजर चिपळूणकरने लांब उडीत तिसरा क्रमांक प्राप्त केला.

१७ वर्षाखालील मुलींमध्ये आयेशा गोलंदाज हिने भालाफेकमध्ये प्रथम क्रमांक, सुहेमा ददनाक तृतीय; शाईमा शाहबंदर ४०० मीटर धावणे प्रथम, २०० मी. धावणे द्वितीय व लांब उडीत द्वितीय क्रमांक मिळवला. १४ वर्षाखालील गटामध्ये हूदा मूंगये याने थाळीफेकमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला.

व्हॉलीबॉलमध्ये १७ वर्षाखालील आणि १९ वर्षाखालील गटात द्वितीय, तर रिले ४X१०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला. याशिवाय प्रीत प्रशांत दिवेकर याची जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूलचे प्राचार्य वासिम सातारेकर, पर्यवेक्षक इश्तियाक अरिफ, क्रीडा शिक्षक हुझैफा कारबारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**पनवेल : रायगड जिल्हा क्रीडा परिषद, क्रीडा अधिकारी कार्यालय आणि नवी मुंबई पोलीस मुख्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धा नुकतीच कळंबोली येथे झाली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा विद्यार्थी अपूर्व प्रशांत ठाकूर याने १९ वर्षाखालील व ७२ किलो वजनी गटात ग्रिको रोमन प्रकारात रौप्यपदक पटकाविले. अपूर्वला प्रशिक्षक रूपेश पावशे यांचे मार्गदर्शन लाभले.**

# टी-२०मध्ये अभिषेकचा नवा विश्वविक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेतील धमाकेदार कामगिरीनंतर आता अभिषेक शर्माने आयसीसी टी-२० क्रमवारीत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. अभिषेक शर्मा हा छोट्या फॉरमॅटमध्ये सातत्याने दमदार कामगिरी करताना दिसतोय. गेल्या काही महिन्यांपासून तो क्रमवारीत नंबर वन आहे. आता टी-२० क्रमवारीच्या इतिहासात त्याने सर्वोच्च रेटिंगचा नवा विश्व विक्रम प्रस्थापित केला आहे.

## क्रमवारीत सर्वोच्च रेटिंगसह मलानचा विक्रम मोडला



यंदाच्या टी-२० आशिया चषक स्पर्धेत अभिषेक शर्माने ३००पेक्षा अधिक धावा केल्या. अभिषेकच्या भात्यातून सलग तीन अर्धशतके पहायला मिळाली. या कामगिरीच्या जोरावर त्याने टी-२० क्रमवारीच्या आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वोच्च रेटिंगचा डाव साधलाय. याआधी इंग्लंडचा डेविड मलान ९१९ या सर्वोच्च रेटिंगसह टॉपला होता. अभिषेक शर्माने ९२६ रेटिंगवर पोहचत इंग्लंडच्या माजी बॅटरला मागे टाकत नवा वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे.

मलान याने २०१०मध्ये आयसीसी क्रमवारीत टॉपला पोहचताना ९१९ रेटिंग पॉइंट्स कमावले होते. जवळपास १५ वर्षे त्याचा हा रेकॉर्ड अबाधित राहिला, पण आता अभिषेकने हा रेकॉर्ड मोडीत काढला आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com